# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### राज्यात हिंस्र प्राण्यांच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या नागरीकांना वैद्यकीय प्रमाणपत्र विनाविलंब देण्याबाबत

**(१) ३५००६ (०५-०१-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंस्र प्राण्यांच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या नागरीकांना वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे शासनाकडून नुकसान भरपाई देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर मेडिकल कॉलेजचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.भास्कर सोनारकर यांच्याकडून ग्रामीण भागातील रुग्णांना वैद्यकीय प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी पीडित नागरिकांनी माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये पत्रकार परिषद घेऊन आपल्या तक्रारी व व्यथा मांडल्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधींनी याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी वैद्यकीय शिक्षण विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने याप्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,

(५) असल्यास, त्यानुसार याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०५-२०२४) :** (१) वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीस वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारावर प्रचलित तरतुदीनुसार अर्थसहाय्य अदा करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शहापूर (जि. ठाणे) येथे जाहिर केलेला इको सेन्सिटिव्ह झोन रद्द करण्याची केलेली मागणी

**(२) ३८५६९ (०९-०४-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि. ठाणे) येथील ६६ गावे इको सेन्सिटिव्ह जाहिर केल्याने अनेक आदिवासी गावपाडे हे बाधित होणार असल्याने स्थानिकांना रोजगार मिळणार नसल्याने हा झोन रद्द करण्याची मागणी माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान श्रमजीवी संघटनेने आंदोलन केले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०५-२०२४) :** (१) इको सेन्सिटीव्य झोन रद्द करणे व त्यासोबत इतर मागण्यासंदर्भात दिनांक २८.१२.२०२१ रोजी उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांचे कार्यालयावर मोर्चा आणणार असल्याचे निवेदन श्रमजीवी संघटना-महाराष्ट्र यांनी दिनांक २०.१२.२०२१ रोजी उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांना निवेदन दिले आहे.
(२) दिनांक १०.०८.२०१७ रोजी तानसा अभयारण्याचे सभोवताली पर्यावरण क्षेत्र (Eco Sensitive Zone) घोषित करणेबाबतची जारी केलेली प्रारुप अधिसूचना (Draft Notification) कालबाह्य झाल्याने नवीन (Fresh) प्रस्ताव सादर करण्याबाबत केंद्र शासनाच्या दिनांक ०४.०३.२०२२ अन्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार दिनांक ०६.११.२०२३ रोजी तानसा अभयारण्याचे सभोवतालच्या पर्यावरण क्षेत्र (Eco Sensitive Zone) घोषित करण्याची प्रारुप अधिसूचना केंद्र शासनास सादर करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांच्या न्यायालयात केसेस चालवून वेगवेगळया पध्दतीने न्यायनिवाडा झाल्याबाबत**

**(३) ४०८७३ (१२-०४-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांच्याकडे हनुमान कृष्णा म्हात्रे मौजे कशेळी ता भिवंडी येथील सव्हे क्र.४८ मध्ये टेनेन्से केस क्र२३९/२०२१ चालू असून मागील काही वर्ष सन २००७ पासून तहसिलदार यांच्या न्यायालयात २०१४ साली उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयात केसेस चालवून वेगवेगळया पध्दतीने न्यायनिवाडा झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषिपूरक नोंदणी दिनापूर्वी म्हणजे सन १९५६ पूर्वी कृष्णा म्हात्रे यांच्या कुळकायदा कलम ७० ब ने फेरफार क्र. ३२५ पाहता कुळ घोषित झालेले असून काही विधीतज्ञांच्या गैरसमजूतीमुळे त्यांच्या जागेच्या कागदपत्रांचे व्यवस्थित अवलोक न करता चुकीच्या पध्दतीने कुळकायदा ७० ब घोषित असतानाच फेरफाार क्र.३२५ नुसार कृषीदिनापूर्वीच कुळनोंदी झालेली आहे व आतासुध्दा ७० ब ने कुळ घोषित केला आहे, तरी उपविभागीय अधिकारी यांनी सदर प्रकरणांमध्ये शेतकरी हनुमान कृष्णा म्हात्रे यांची तहसिलदार शेतजमिन न्यायाधिकरण भिवंडी यांच्याकडे कुळकायदा कलम ३२ ग ची याचिका कर्त्याची कारवाई चालविण्यासाठी आदेश करण्यासाठी दिनांक १३ डिसेंबर, २०२१ रोजी निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबधित शेतकरी अज्ञानी अडाणी असल्यामुळे कायदेशीर माहिती त्यांना चुकीची मिळत होती, त्यामुळे त्यांचे कृषिदिनापूर्वीच टेनेन्सी हुकूम फेरफार क्र.३२५ झालेली असतांना तहसिलदार यांनी त्यांचे खातरजमा न करताच गैरव्यवहाराच्या दृष्टीनेच त्यांचे अर्ज फेटाळल्याने अशा भ्रष्टअधिका-यावरती कारवाई करुन संबधित शेतक-यांना शासन न्याय देणार का,तसचे.अशा अज्ञानी अडाणी शेतक-यांसाठी जमिनीचे टेनेन्सी कायदयाप्रमाणे चालणाऱ्या दाव्यांसाठी व त्यांच्या नियमांसाठी शेतक-यांमध्ये जागरुकता आणण्यासाठी शासन प्रत्येक महसूल खात्यातचे धोरण अवलंबणार का, तसेच फलक प्रत्येक अर्धन्यायिक प्रकरणासाठी संबधित विभागाकडे लावण्यात येणार का नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-०६-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) अर्जदार श्री.लहु कृष्णा म्हात्रे व श्री. हनुमान कृष्णा म्हात्रे यांनी प्रस्तूत प्रकरणी उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांच्याकडे महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ मधील तरतूदी अन्वये अपील क्र.२३१/२०२१ दाखल केले होते.

महाराष्ट्र शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७४ नुसार उपविभागीय अधिकारी यांचे न्यायालयात टेन्सिसी अपिल क्र. २३१/२०२१ दाखल असलेल्या अपीलामध्ये दि.२७/७/२०२२ रोजीचा आदेश पारित करण्यात आले असून

त्या आदेशान्वये तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, भिवंडी यांचे दि.१/२/२०२१ रोजीचे आदेश कायम करण्यात आले आहेत.

अर्जदार याबाबत समाधानी नसल्यास ते योग्य त्या सक्षम न्यायालयात दाद मागू शकतात.

---

**कोरोनात मृत्यू पावलेल्या मृत व्यक्तींच्या वारसांना अनुदान मिळण्याबाबत**

**(४) ४९७०६ (२२-०१-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनात मृत्यू पावलेल्यांच्या वारसांना शासनाने ५० हजारांचे अनुदान घोषित केले असून आजपर्यंत बहुतांश वारसांना अनुदान मिळाले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील गिरगांव येथील स्वेटर गल्ली, श्रीपती ज्वेलर्स, रुम नं ४०० येथे राहणारे रमेश काशिराम पांचाळ (आयडी नं. सीओ २००६०६१६) यांचा कोरोनामध्ये मृत्यू झाला असून, त्यांच्या वारसाना अद्याप मदत मिळालेली नसल्याने त्यांची पत्नी यांना आर्थिक मदत मिळावी म्हणून विविध कार्यालयामध्ये ये-जा करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच रायगड जिल्ह्यात आतापपर्यंत कोरोनामुळे किती लोकांचा मृत्यु झाला असून, मृत्यु पावलेल्या वारसांनी अनुदानासाठी मागणी केली असून, त्यानुसार त्यांना ५० हजार अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच राज्यात अद्याप वारसांना आर्थिक मदत न मिळालेले किती अर्ज आहेत याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, बहुतांश नातेवाईकांनी एकाच व्यक्तींच्या नावे शासनाकडून ५० हजार अनुदान दोन वेळा घेतल्याचेही निदर्शनास आल्याने उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (१०-०६-२०२४) :** (१) नाही.

(२) नाही, कै. रमेश काशिराम पांचाळ यांच्या जवळच्या नातेवाईकास दिनांक १६.०३.२०२४ रोजी सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे.

(३) रायगड जिल्ह्यात कोविड-१९ मुळे ५२०३ व्यक्तींचा मृत्यु झालेला आहे. त्यापैकी ४६५८ मृत्यु पावलेल्या व्यक्तींच्या निकटच्या नातेवाईकास सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे व ४७१ व्यक्तींचे अर्ज नामंजूर करण्यात आलेले आहेत. तसेच ७४ प्रलंबित अर्जावर कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(४) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने मंजूर केलेल्या सर्व अर्जदारांना सानुग्रह सहाय्य देण्यात आलेले आहे.

(५) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांना सानुग्रह सहाय्य मंजूर केलेल्या प्रकरणांची सविस्तर माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असून ज्या अर्जदारांना जादा सानुग्रह सहाय्य मंजुर झाले आहे त्या अर्जदारांकडून परतफेड प्रक्रियाची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु करण्यात आलेली आहे.

---

**राज्यातील गडकिल्ल्यांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी**
**शासन महामंडळाची स्थापना करणार असल्याबाबत**

**(५) ५३४७३ (२९-०१-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गडकिल्ल्यांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी शासन महामंडळाची स्थापना करणार असल्याचे माहे सप्टेबंर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गडकिल्याचा विशेष कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किती गड किल्ल्यांचे संवर्धन आणि सुशोभीकरण करण्यात येणार आहे, कधीपासून प्रत्यक्ष या कामास सुरुवात होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०५-२०२४) :** (१) राज्यातील गड-किल्ल्यांच्या जतन-संवर्धनासाठी दुर्गप्रेमी तरुणांनी आझाद मैदान, मुंबई येथे आंदोलन केले होते, त्याप्रसंगी मा. मुख्यमंत्री महोदयांनी आंदोलकांची भेट घेऊन त्यांचे निवेदन स्विकारले. त्या निवेदनात गड-किल्ल्यांच्या संवर्धनासाठी महामंडळाची स्थापना करण्याच्या मागणीचा समावेश आहे.

(२) व (३) राज्यातील गड-किल्ल्यांसह राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन व संवर्धनाची कामे नियमित निधीतून करण्यात येतात. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात जतन व संवर्धनाच्या कामांसाठी एकूण रु.१९०.१५ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली होती. तसेच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात जतन व संवर्धनाच्या कामांसाठी एकूण रु.२५८.६६ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. राज्य संरक्षित स्मारकांचे सुनियोजित व्यवस्थापन करण्याच्या हेतूने राज्यस्तरावर, जिल्हास्तरावर, स्मारकस्तरावर महावारसा समिती स्थापन करण्याचा निर्णय शासन निर्णय दिनांक १६.०२.२०२४ नुसार घेण्यात आला आहे. उपलब्ध निधी व निकषांच्या अधिन राहून गड-किल्ल्यांच्या जतन व संवर्धनाच्या कामाचे नियोजन करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे इनामगांव (ता. शिरुर, जि.पुणे) येथील ३५०० ई.पूर्व काळातील**
**जोर्वे कालीन संस्कृतीचे जतन संवर्धन करण्याबाबत**

**(६) ५४०५६ (२१-०१-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे इनामगांव (ता.शिरुर, जि.पुणे) येथे सन १९६८ ते १९८२ या १४ वर्षाच्या कालावधीमध्ये उत्खनन केले असून या उत्खननामध्ये सामुहिक वस्ती वर्तुळ आकाराची जमिनीखाली तळघरे सापडली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील अवशेष व मोल्यवान वस्तू डेक्कन कॉलेज पुणे पुरातत्व विभाग यांनी जतन करुन ठेवले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्थळाचा विकास तसेच संशोधन व उर्वरित भागाचे उत्खनन करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व तदनुषंगाने स्थळास पर्यटन स्थळ म्हणून घोषीत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०५-२०२४) :** (१) हे खरे आहे.

सदर उत्खनन प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृति आणि पुरातत्व विभाग, डेक्कन कॉलेज, पुणे यांनी केले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृति आणि पुरातत्व विभाग, डेक्कन कॉलेज, पुणे यांनी प्रश्नाधीन स्थळाची विस्तृत प्रमाणावर उत्खनन करुन पुस्तकरुपी अहवाल सन १९८८ साली प्रसिध्द केला आहे. सबब प्रश्नाधीन बाब सद्यस्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.
(४) प्रश्नाधीन स्थळ शासन अधिसूचना दिनांक ०३.०९.१९९५ नुसार राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तेर (जि.धाराशीव) येथील महादेव त्रिविक्रम मंदिर, तिर्थकुंड व चैत्यगृह या स्मारकांच्या विकास आराखड्यास मान्यता मिळण्याबाबत

**(७) ५५६२३ (२१-०१-२०२३). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तेर (जि.धाराशीव) येथील महादेव त्रिविक्रम मंदिर, तिर्थकुंड व चैत्यगृह या स्मारकांच्या विकास आराखड्यास मान्यता मिळण्याबाबत दिनांक १७.११.२०२२ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील वैशिष्ट्यपूर्ण व ऐतिहासिकदृष्ट्या अनन्य साधारण महत्त्व असलेल्या सदरहू स्मारकांचा काळ हा साधारणत: सोळाशे वर्षापेक्षा अधिक असून ही सर्व स्मारके महाराष्ट्र शासनाचे संरक्षित स्मारके असून पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत सदर स्मारकांची अत्यंत दयनीय अवस्था असून त्रिविक्रम मंदिराच्या ठिकाणी स्मारकास मोठे तडे गेलेले असून मोठ्या प्रमाणावर झाडे-झुडपे उगवली आहेत तसेच तिर्थकुंडाच्या ठिकाणीही झाडेझुडपे असून अस्वच्छता तसेच चैत्यगृहाच्या ठिकाणीही अस्वच्छता असून याठिकाणी करण्यात आलेले छत हे डबघाईला आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील मंदिरांचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक असून सदरील क्षेत्राचा सर्वंकष स्थळ व्यवस्थापन विकास आराखडा तयार करून निधी उपलब्ध करून देण्याबाबत मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय
(५) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने आराखडा तयार करून निधी उपलब्ध करणेबाबत तसेच स्मारकांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता या स्मारकांचे तातडीने संवर्धन करणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०६-२०२४) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३), (४) व (५) हे अंशत: खरे आहे.
प्रश्नाधिन त्रिविक्रम मंदिर, तिर्थकुंड व चैत्यगृह, तेर ता.जि.धाराशिव या राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन-संवर्धनाच्या कामांच्या निविदेस अनुक्रमे शासन निर्णय दिनांक १५.०९.२०२३, दिनांक २३.११.२०२३ व दिनांक २३.११.२०२३ नुसार मंजुरी देण्यात आली असून सद्यस्थितीत कामे प्रगतीपथावर आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औसा (जि.लातूर) येथे जंगली प्राण्यामुळे शेती पिकांचे नुकसान होत असल्याबाबत

**(८) ५९२२५ (२१-०४-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) तालुक्यात हरीण, रानडुक्कर व वानरे या जंगली प्राण्यामुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी दरवर्षी मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाल्याने आपदग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत व जंगली प्राण्यांपासून नुकसान टाळण्याकरिता कार्यवाही करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०५-२०२४) :** (१) सन २०२२-२३ मध्ये औसा (जि. लातूर) तालुक्यात वन्यप्राण्यांनी शेतपिकाचे नुकसान केलेल्या ९ घटना निदर्शनास आल्या असून प्रस्तुत प्रकरणांमध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(२) व (३) विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांनी श्री. अभिमन्यु पवार, वि.स.स. यांनी जिल्हा नियोजन समिती, लातुर येथे वन विभागाच्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या मुद्दांची माहिती मा. विधान सभा सदस्य व जिल्हाधिकारी (नियोजन विभाग), लातूर यांना उपलब्ध करुन दिली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अहमदनगर जिल्ह्यातील जळीतामुळे बाधीत झालेल्या कुटुंबीयांचे अनेक प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(९) ६०९९१ (२४-०४-२०२३). श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यातील जळीतामुळे बाधीत झालेल्या कुटुंबीयांसाठी सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्ती या लेखाशीर्षाखाली अनेक प्रस्ताव शासनाकडुन देण्यात येणाऱ्या अनुदानासाठी जिल्हा प्रशासनाकडे सादर होऊनही निधी उपलब्ध नसल्यामुळे गत एक वर्षापासुन प्रलंबीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील किती प्रकरणे आज अखेर प्रलंबित आहेत व यासाठी किती निधीची आवश्यकता आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार प्रलंबित असलेली प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (२४-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) अहमदनगर जिल्ह्यात राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषानुसार मदत देय असलेली जळीताची कोणतीही प्रकरणे आज अखेर प्रलंबित नाहीत.
(३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक १३.०५.२०१५ व दिनांक २५.०१.२०१८ व दिनांक २७.०३.२०२३ मध्ये जळीतामुळे झालेल्या शेतीमालाचे नुकसान, घरातील सामानाचे नुकसान इत्यादीकरिता मदत देण्याची तरतूद नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### वणी (जि.यवतमाळ) येथील वेकोली व खाण परिसरातील फोसोफिस वनस्पती जंगल नष्ट करण्याबाबत

**(१०) ६१३३६ (२१-०४-२०२३). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी (जि.यवतमाळ) येथील वेकोली व खाण परिसरातील पिंपळगांव, बोरगांव, जुनाड, उकणी, कोलेरा, पिंपरी, गोवारी, निळापूर, ब्राम्हणी, निलजई, बेलोरा, नायगांव बु. मुंगोली, माथोली, जुगाद, चिखली, टाकळी, येनक, शिवणी, साखरा कोलगांव गावाजवळ फोसोफिस वनस्पतीमुळे मोठ्या प्रमाणात झुडकी जंगल झाल्यामुळे त्या परिसरामध्ये वाघाचा मुक्त संचार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खाणीबाधीत शेतकरी, शेतमजुरांची गाय, बैल व शेळी अशी अनेक जनावरे वाघाने ठार मारल्यामुळे नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली असून रांगणा, भूरकी, नांदेपेरा या ठिकाणी वाघांचा मुक्त संचार असल्याने जंगलालगत असलेल्या केसुर्ली, मंदर, वारगांव, चारगांव, शेवाळा, कवडशी याभागातही वाघाचा वावर आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वाघांपासून जनावरे व नागरिकांचे संरक्षण करण्याकरिता कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०५-२०२४) :** (१) व (२) पांढरकवडा वनविभागा अंतर्गत वणी (जि. यवतमाळ) येथील खुल्या कोळश्याच्या खदाण परिसरातील उखणी, कोल्हार, पिंपर, बोरगाव, निलजई व कुंभारखणी गावाजळ प्रोसोपिस वनस्पतीमुळे मोठ्या प्रमाणात झुडपी जंगल झाल्यामुळे त्या परिसरामध्ये वाघाचा संचार होता. तथापि, सदर क्षेत्रामध्ये मनुष्य हानी व पशुधन हानी होवू नये याकरीता सदर वाघाला प्रचलित नियमानुसार दिनांक ०७.१२.२०२२ रोजी जेरबंद करण्यात आले आहे.
(३) वाघांपासून नागरिकांचे व पाळीव जनावरांचे संरक्षण होण्याकरीता क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वाघाचे अस्तित्व असलेल्या जंगल क्षेत्रात ट्रॅप कॅमेरा लावून वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येते.
- वाघाचे अस्तित्व असलेल्या क्षेत्रात वनकर्मचाऱ्यांमार्फत नियमीत गस्त करण्यात येते.
- ग्रमस्थांची बैठक घेवून वाघाचे अस्तित्व असलेल्या क्षेत्रामध्ये घ्यावयाच्या दक्षतेबाबत जनजागृती करण्यात येते. तसेच वाघाचे अस्तित्व आढळून आल्यास तात्काळ वनविभागास माहिती देण्याबाबत कळविण्यात येते.
- मानवी जिवितास धोकादायक ठरणाऱ्या वाघास प्रचलित नियमाचे पालन करुन जेरबंद करण्यात येते.
- घनदाट झुडपे, लॅन्टेना यामुळे शोध मोहिमेमध्ये अडथळा येत असल्यामुळे त्याचे उच्चाटन करण्यात येते.
- वाघाचा वावर असलेल्या क्षेत्रात गुराख्यांना जनावरे घेवून जाण्यास मनाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील हत्तीपाठोपाठ वाघ व बिबट्यांनाही गुजरात राज्यात पाठविण्यात येत असल्याबाबत

**(११) ६१६०७ (१९-०४-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील हत्तीपाठोपाठ वाघ व बिबट्यांनाही तसेच महाराष्ट्रातले उद्योगांपाठोपाठ गोरेवाडा प्रकल्पातील वन्यप्राणीदेखील ४ वाघ आणि ४ बिबटे कुणालाही माहिती होऊ न देता रात्री गुजरातला रवाना करण्यात आल्याची माहिती दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील दोन ते तीन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या इतर राज्यांच्या अर्जांची दखल न घेता गुजरात मधील जामनगरच्या ताब्यात गोरेवाडा प्रशासनाने वन्यप्राणी देण्यास होकार दिला, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाने शिक्कामोर्तब केलेल्या साहेबराव या वाघाला न नेता इतर वाघ व बिबट्यांना घेऊन गेल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी केंद्रीय प्राणि संग्रहालय प्राधिकारणाच्या नियमांचे उल्लंघन केले असून गोरेवाडा प्रशासनाने विविध माध्यमांपासून लपवून ठेवली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने संबंधितांवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०५-२०२४) :**(१) गोरेवाडा वन्यप्राणी बचाव केंद्र, नागपूर येथिल चार वाघ (दोन नर, दोन मादी) आणि चार बिबटे (तीन नर, एक मादी) या वन्यप्राण्यांना ग्रीन्स झूलॉजिकल, रेस्कयु ॲन्ड रिहॅबिलीटेशन सेंटर, जामनगर, गुजरात येथे पाठविण्यास दिनांक १३.०१.२०२३ रोजी केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी परवानगी दिली आहे.

केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी दिलेल्या परवानगी नुसार दिनांक २१.०१.२०२३ रोजी गोरेवाडा वन्यप्राणी बचाव केंद्र, नागपूर येथिल चार वाघ (दोन नर, दोन मादी) आणि चार बिबटे (तीन नर, एक मादी) या वन्यप्राण्यांना ग्रीन्स झूलॉजिकल, रेस्कयु ॲन्ड रिहॅबिलीटेशन सेंटर, जामनगर, गुजरात येथे पाठविण्यात आले आहे.
(२) ग्रीन्स झूलॉजिकल, रेस्कयु ॲन्ड रिहॅबिलीटेशन सेंटर, जामनगर, गुजरात व्यतिरीक्त कमला नेहरु प्राणीसंग्रहालय, इंदौर, नागालँड झूलॉजिकल पार्क, नागालँड, टाटा स्टील झूलॉलिकल पार्क, जमशेदपूर झारखंड अशा विविध प्राणी संग्रहालयांकडून सन २०२१ व २०२२ मध्ये गोरेवाडा वन्यप्राणी बचाव केंद्राकडे प्राप्त झालेले वन्यप्राणी मागणीबाबतचा प्रस्ताव वेळोवेळी केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाकडे सादर करण्यात आला आहे.
(३) वन विभागाकडून साहेबराव असे कोणत्याही वाघाचे नामकरण करण्यात आलेले नाही. तसेच केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण यांचेकडून प्राप्त परवानगीमध्ये केवळ वन्यप्राण्यांची प्रजाती व लिंग नमुद करण्यात आले असून प्राण्यांचे विशिष्ट नाव नमुद करण्यात आलेले नाही.
(४) गोरेवाडा वन्यप्राणी बचाव केंद्र येथे वन्यप्राणी दाखल करुन घेणे किंवा अन्यत्र स्थलांतरीत करणे हे बचाव केंद्राकडे असलेल्या कर्तव्यापैकी नियमीत कामकाजाचा भाग असल्यामुळे त्यासाठी प्रसिध्दी पत्रक जारी करण्यात आलेले नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिकच्या पश्चिम घाटात वनक्षेत्र वणवे आणि जंगलतोडीमुळे दिवसेंदिवस ओसाड होत असल्याबाबत**

**(१२) ६३१०० (२१-०४-२०२३). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिकच्या पश्चिम घाटात वनक्षेत्र मोठ्या प्रमाणात असून हे वनक्षेत्र वणवे आणि जंगलतोडीमुळे दिवसेंदिवस ओसाड होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इगतपुरी-घोटी, त्र्यंबकेश्वर, पेठ तालुक्यातील वनक्षेत्रात वन्यजीवांची तहान भागवण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करुन बांधलेले वनतळे निकृष्ठ दर्जाच्या कामामुळे कोरडे पडल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यावर्षी चांगला पाऊस पडूनही दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण होऊन जंगलातील वन्यजीव तहान, भूक भागवण्यासाठी गावात, शहराकडे येऊ लागल्यामुळे वन्यजीव आणि भयाची चिंता करणाऱ्यांनी जंगलातील असुरक्षिततेबद्दल अधिक सजग व्हावे, असे आवाहन त्र्यंबकेश्वर तालुका जल, जमीन, जंगल वाचवा अभियानाने केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी वन्यजीवांचे पिण्याच्या पाण्यावाचून घाट, जव्हार घाट, इगतपुरी-घोटीचे समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०५-२०२४) :** (१) नाशिक वनविभागाच्या वनक्षेत्रात वणवे,आणि जंगलतोडीमुळे ओसाड होत असल्याच्या घटना वन विभागाच्या निदर्शनास आलेल्या नाहीत. वनक्षेत्रात वणवे लागू नयेत आणि

वृक्षतोड  होऊ नये याबाबतची संपूर्ण दक्षता वनविभाग घेत असते.
(२) वन विभागात विविध योजने अंतर्गत वनतळे, दगडी  नालाबांध व सलग समतोल चर इत्यादी कामे वनांमध्ये जल व मृद संधारण होण्यासाठी केली जातात. सन २०२०-२१ ते २०२२-२३ या मागील तीन वर्षात पूर्व भाग व पश्चिम भागात खालील प्रमाणे वनतळयांची कामे करण्यात आली आहेत.

| | **वर्ष** | **एकूण वनतळे कामांची संख्या** |
|---|---|---|
| पूर्व विभाग   नागपूर | २०२०-२१ | ५९ |
| | २०२१-२२ | ३६ |
| | २०२२-२३ | २२ |
| | एकूण | ११७ |
| पश्चिम विभाग नागपूर | २०२०-२१ | १२७ |
| | २०२१-२२ | ४९ |
| | २०२२-२३ | २२ |
| | एकूण | १९८ |

उपरोक्तप्रमाणे (११७+१९८=३१५) अशी एकूण ३१५ वनतळयांची कामे करण्यात आली असुन सदरची कामे ही गुणवत्तापूर्वक झाली असल्याने कामाबाबत वन विभागाकडे तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

सदरच्या जल व मृद संधारण कामांमुळे जमीनीची धूप थांबवून पाण्याचा साठा टिकवून ठेवण्यात मदत होते. तसेच जैविक संवर्धनासाठी, वन्यप्राण्यांना, पशुपक्षांना पिण्यासाठी पाण्याची अप्रत्यक्षरित्या सुविधा उपलब्ध होते. वन विभागाच्या विविध योजनेतंर्गत वन्यजीवांसाठी कृत्रिम पाणवठे निर्माण करण्यात येत आहेत.
(३) इगतपुरी-घोटी, त्र्यंबकेश्वर व पेठ तालुक्यामध्ये अशा प्रकारची दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याचे या वनविभागाच्या निदर्शनास आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे कुडे (ता.जि.पालघर) येथील वन विभागाच्या संरक्षित जागेत “खाजगी जागा” असल्याचा बोर्ड लावल्याबाबत

**(१३)  ६४०५८ (२१-०४-२०२३).  श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कुडे (ता.जि.पालघर) येथील सर्व्हे नं.७०/१ व राष्ट्रीय महामार्ग येथे वन विभागाच्या संरक्षित वने दर्जा असलेल्या जागेत “खाजगी जागा” असल्याचा बोर्ड लावून भूमाफियांमार्फत शेतजमीन नसल्याचे पुरावे नष्ट केल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सचिव, वन विभाग यांना दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कथित भूसंपादनाच्या प्रक्रियेमध्ये दोषी आढळून आलेल्या अधिकारी व व्यक्तींविरुद्ध कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०५-२०२४) :** (१)  मौजे कुडे (ता.जि. पालघर) संबंधीत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सचिव वनविभाग यांना   दिनांक २३.०१.२०२३ रोजी लेखी निवेदन दिले होते.

मौजे कुडा, तालुका, जिल्हा पालघर येथील सेर्वे नंबर ७०/१ हे मालकी क्षेत्र आहे. तथापि, मौजे कुडा येथील सर्वे नंबर १२२/अ/४४ या क्षेत्रात खाजगी जागा असल्याचा बोर्ड लावला असुन सर्व्हे नं.१२२/अ/४४ चे क्षेत्र ०.४३.०० हे.आर. मुंबई गॅझेट अधिसुचना क्र.३६/१८/१६८५७ दिनांक ०६.११.१९४७ च्या मुंबई गॅझेट अधिसूचना अन्वये निर्वणीकरण झालेले आहे.

(२) मौजे – कुडे सर्व्हे नं. ७०/अ ही जमीन भूसंपादित होत नाही. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील महसूल विभागातील रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत

**(१४) ६४५६३ (२९-०८-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या महसूल विभागात विविध संवर्गातील तब्बल १३ हजार ५३६ पदे रिक्त असून शेतकऱ्यांचा वारंवार संपर्क येणाऱ्या तलाठ्यांची सर्वाधिक ५ हजार ३० रिक्त पदे, तहसीलदारांची ६६ रिक्त पदे, नायब तहसीलदारांची ५२४ रिक्त पदे असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदामुळे ग्रामीण पातळीवरील सर्वसामान्यासह शेतकऱ्यांच्या विविध कामाना नैसर्गिक आपत्तीच्या वेळी पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यास व अनुदान वाटपात विलंब होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,महसूल विभागातील रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०६-२०२४) :** (१), (२) व (३) राज्यात महसूल विभागात विविध संवर्गांची पदे रिक्त आहेत. त्यापैकी तहसिलदार, गट-अ संवर्गातील ७८ रिक्त पदे पदोन्नतीने भरण्यात आली आहेत.

नायब तहसिलदार, गट-ब संवर्गातील ५३० पदे रिक्त आहेत. सदर पदे भरण्याकरीता आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. अमरावती महसूल विभागातील ४७ व छत्रपती संभाजीनगर महसूल विभागातील ५९ अव्वल कारकून/मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचा-यांना नायब तहसिलदार या पदावर माहे नोव्हेंबर, २०२३ अखेरीस पदोन्नती देण्यात आली आहे. नागपूर, नाशिक व कोकण विभागातील अव्वल कारकून/मंडळ अधिकारी यांना नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नती देण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.

तलाठी, गट-क या संवर्गाची ५०३० पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे भरण्याकरीता एकूण ४६४४ तलाठी पदभरतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत रिक्त तलाठी सजांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या तलाठी संवर्गातील कर्मचा-यास सोपण्यात आला असून नैसर्गिक आपत्तीच्या वेळी प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी तसेच नागरिकांची कामे प्रलंबित राहणार नाहीत यासाठी, दक्षता घेण्यात आली आहे.

४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील आदिवासी ठाकूर समाजातील लाभार्थ्यांना जातीचा दाखला उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१५) ६५१५४ (३१-०८-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रायगड जिल्ह्यात आदिवासी ठाकूर समाजातील लाभार्थ्यांना शासनाच्या अटी व शर्ती तसेच जातीचा दाखला उपलब्ध नसल्यामुळे शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यास अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी समाजातील प्रत्येक कुटूंबांना त्यांचे हक्काचे घर मिळावे यासाठी शासनाच्या माध्यमातून प्रयत्न सुरू असताना जातीच्या दाखल्यासाठी १९६१ सालचे पुरावे उपलब्ध नसल्यामुळे शासनाच्या विविध योजनेपासून ते वंचित रहात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून आदिवासी समाजातील कुटूंबांना त्यांचे हक्काचे घर मिळणे, तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी जातीचा दाखला सहजरित्या उपलब्ध होणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०५-०६-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

"महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० व सदर अधिनियम अंतर्गत पारीत महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम,२००३", दिनांक ०४.०६.२००३ मधील तरतुदीनुसार अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याची व त्याच्या पडताळणीची कार्यवाही करण्यात येते.

सदर अधिनियमातील तरतुदी या सर्व अनुसूचित जमातींना लागू असून त्यानुसार जात प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मयूर नायगाव (ता.पाटोदा, जि.बीड) येथील अभयारण्यातील मोरांचे अस्तित्व धोक्यात आल्याबाबत

**(१६) ६६०१३ (२५-०८-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मयूर नायगाव (ता.पाटोदा, जि.बीड) येथे मोरांसाठी राखीव अभयारण्य अस्तित्वात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अभयारण्यात सन २०१९ च्या गणतीनुसार १० हजार पेक्षा अधिक मोर अस्तित्वात होते मात्र अलीकडच्या काळात ही संख्या तब्बल ५ हजारांनी घटल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असल्याने याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे कार्यवाहीची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वन परिक्षेत्राला लागून असलेल्या राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग व अन्य रस्त्यांना लागून बिअर बार्स, धाबे व हॉटेल्स अस्तित्वात असल्याने या वन परिक्षेत्रात मानवी हस्तक्षेप वाढल्यामुळे मोरांची संख्या घटल्याचे तज्ज्ञांचे मत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०५-२०२४) :** (१), (२) व (३) सन २०१९ च्या प्रगणनेमध्ये नायगाव मयुर अभयारण्यामध्ये ८२०३ मोर तर सन २०२२ च्या प्रगणनेमध्ये ७००० मोरांचे वास्तव्य असल्याचे आढळून आले आहे.

सन २०२३ मध्ये प्रगणनेच्या कालावधीत हवामान खात्याच्या अतिवृष्टीच्या इशाऱ्यामुळे बौध्द पौर्णिमेला पाणवठा प्रगणना करण्यात आली नाही. तथापि, वन्यजीव व्यवस्थापनाकरीता नायगाव मयुर अभयारण्याकरीता तयार करण्यात आलेल्या व्यवस्थापन आराखड्यानुसार संरक्षण व संवर्धन करण्याची कार्यवाही करण्यात येते.

अभयारण्य क्षेत्राला लागुन असलेल्या मालकी क्षेत्रामध्ये बिअर बार / धाबे /हॉटेल्स अस्तित्वात असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र नायगाव वन्यजीव वनपरिक्षेत्रातील वनक्षेत्रात बिअर बार / धाबे /हॉटेल्स यांचे अतिक्रमण झाल्याचे दिसून येत नसून वन्यजीवांच्या अधिवासावर विपरीत परिणाम होवू नये याकरीता दक्षता घेण्यात येत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सातपुडा (जि.जळगांव) या भागात वन्य प्राण्यांसाठी पाण्याची सोय करण्याबाबत

**(१७) ६६१४७ (२५-०८-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातपुडा (जि.जळगांव) या भागात पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत आहेत, तथापि, वन विभागाने पाण्याची अपुरी व्यवस्था केल्यामुळे वन्यप्राण्यांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेकदा या वन्यप्राण्यांना पाण्यासाठी जंगलाबाहेर जावे लागत असल्यामुळे या वन्यप्राण्यांची मोठ्या प्रमाणात शिकार होत असल्याचेही प्रकार वाढीस लागले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे शासनाने माहिती घेऊन येथील वन्यप्राण्यांसाठी पाण्याचे पाणवठे तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०५-२०२४) :** (१), (२) व (३) यावल वन विभागामधील वनपरिक्षेत्रांमध्ये वन्यप्राण्यांना पिण्याचे पाण्यासाठी नैसर्गिक पाणवठे असून सिमेंट नालाबांध व श्रमदानातून कृत्रिम पाणवठे तयार करण्यात आले आहेत. सदर क्षेत्रात जुने मोठे माती (धरण), मात्रण मध्यम प्रकल्प, मंगरुळ धरण, वड्री धरण, मोर धरण, मध्यम गुळ प्रकल्प तसेच सुकी, अनेर व मोर या नद्या असल्याने वन्यप्राण्यांना नैसर्गिक पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत उपलब्ध आहेत.

तथापि, पर्जन्यमान कमी होण्याची शक्यता विचारात घेता वन्यप्राण्यांना वनक्षेत्रामध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता यावल वनविभागामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- जंगल क्षेत्रातील नैसर्गिक पाण्याच्या स्त्रोतांचे परिक्षण करण्यात येते.
- सन २०२२-२३ मध्ये १० व सन २०२३-२४ मध्ये २० कृत्रिम पाणवठ्यांची र्निमिती करण्यात आली आहे.
- सन २०२१-२२ मध्ये ११, सन २०२२-२३ मध्ये २० व सन २०२३-२४ मध्ये १ सिमेंट नालाबांधची र्निमिती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमडापूर (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत महोगनी वृक्ष लागवडीचे देयके शेतकऱ्यांना न मिळाल्याबाबत**

**(१८) ६७३८४ (२५-०८-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमडापूर (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील श्री.गणेश भास्कर पाखरे व इतर दहा शेतकऱ्यांनी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत महोगनी वृक्षाची लागवड केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात देयके देऊनही वेळेच्या आत संकेत स्थळावर नोंदविली न गेल्याने अद्यापपर्यंत कुशल व अकुशल कामाचे देयकेही त्यांना मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांनी कर्ज काढून महोगनी वृक्षाची लागवड केली असून त्यांची देयके मिळाली नसल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट आले असून देयके देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०६-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे. श्री. भास्कर दौलत पाखरे व इतर ११ शेतकऱ्यांनी महोगनी वृक्ष लागवड केली होती.
(२) हे खरे नाही.
(३) कुशल देयके विहीत कालावधीत प्राप्त न झाल्यामुळे संकेतस्थळावर नोंदविणे शक्य झाले नाही. सन २०२१-२२ मधील प्रलंबीत कुशल देयके संबंधितास अदा करणे करीता तसेच सन २०२१-२२ मध्ये तांत्रिक अडचणीमुळे सदर देयके माहे, जानेवारी, २०२४ मध्ये लाभार्थ्यांस अदा करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत खाजगी/स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येत असलेल्या अनुदानीत वसतीगृहांमध्ये अनुसूचीत जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्याबाबत**

**(१९) ६७९७६ (१०-१०-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. आवगृ-२०२१/प्र.क्र.८४/का.१२, दिनांक १५ मार्च, २०२३ नुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत खाजगी/स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येत असलेल्या अनुदानीत वसतीगृहांमध्ये सन २०२३-२४ या शैक्षणिक सत्रात अनुसूचीत जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास निर्बंध घातले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अदिवासी विभागाच्या वसतीगृहांची प्रवेश संख्या मर्यादीत असल्याने अनुसुचीत जमातीच्या विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत खाजगी/स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येत असलेल्या अनुदानीत वसतीगृहात प्रवेश नसल्याने त्यांना शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये शिक्षणापासून वंचित रहावे लागेल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पत्र मागे घेवून अनुसुचीत जमातीच्या विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत खाजगी/स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येत असलेल्या अनुदानीत वसतीगृहांमध्ये प्रवेश देण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे वा करण्यात येत आहे काय,
(४) असल्यास, कार्यवाहीची सद्य:स्थीती व तपशील काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (३०-०५-२०२४) :** (१) हे अशंत: खरे आहे
(२) हे खरे नाही.

(३) निरंक
(४) निरंक
(५) निरंक

---

**राज्यात सोलापूर जिल्ह्यातील सुरत चेन्नई ग्रीनफिल्ड हायवेच्या बाधित शेतकऱ्यांना करण्यात आलेली मदत अपुरी असल्याबाबत**

**(२०) ६८९७९ (३१-०८-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सोलापूर जिल्ह्यातील सुरत चेन्नई ग्रीनफिल्ड हायवेच्या बाधित शेतकऱ्यांना एकरी चार ते सात लाख रुपये दिलेली रक्कम अत्यंत तुटपुंजी मदत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरत चेन्नई ग्रीनफिल्ड हायवेच्या बाधित शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलन करण्याचा पवित्रा घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र सरकारच्या नवीन नियमानुसार या बाधित शेतकऱ्यांना मदत मिळणे आवश्यक असतानाही न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास,उक्त शेतकऱ्यांना केंद्र सरकारच्या रस्ते विकास नियमानुसार सहा पट मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३०-०५-२०२४) :** (१), (२), (३) व (४) सुरत - चेन्नई ग्रीनफिल्ड प्रकल्पाकरिता बार्शी, अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यातील भूधारकांनी वाढीव दर / नुकसानभरपाई मिळण्याबाबत सोलापूर - अक्कलकोट रोड तसेच उळे गाव येथे ईटगे - ब्यागेहळळी फाटा येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील सुरत - चेन्नई ग्रीनफिल्ड प्रकल्पाकरिता बार्शी, अक्कलकोट,दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर येथील एकूण ५८ गावांतील जमीनी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६, नुसार संपादित करण्यात येत आहेत. सदर अधिनिमांतर्गत मार्गदर्शक सूचना, भूसंपादन अधिनियम,२०१३ मधील कलम २६ ते ३० मधील तरतूदी व राज्य शासनाकडून निर्गमित प्रचलित शासन निर्णय /परिपत्रके विचारात घेऊन भूसंपादन निवाडे जाहीर करण्यात आले आहेत. त्यानुसार बाधित शेतकऱ्यांना रक्कम देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी जमातीच्या विद्यार्थ्यांची जात प्रमाणपत्र जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक यांचेकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(२१) ६९१७४ (०६-१०-२०२३). श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी जमातीच्या विद्यार्थ्यांची जात पडताळणी करीता सादर केलेली प्रकरणे अनेक वर्षांपासून जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक यांचेकडे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी काही प्रकरणे पाच वर्षापेक्षा अधिकचा कालावधी होऊनही अद्याप निकाली काढण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रमाणपत्र मिळविण्याकरीता विभागीय कार्यालयाकडे सतत फे-या माराव्या लागत असल्याने ती गैरसोय दूर करण्याकरीता जिल्हास्तरावर जात पडताळणी कार्यालय उघडले असून, आवश्यक ती सर्व कागदपत्रे सादर करुन तसेच सर्व त्रुटींची पूर्तता करुनही सदर प्रकरणे निकाली काढण्यात येत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर प्रकरणे ठराविक मुदतीत निकाली काढून आदिवासी विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र तातडीने मिळावे यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०५-०६-२०२४) :** (१) व (२) नाशिक जिल्हयामध्ये एकूण २ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या कार्यरत आहेत. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक अंतर्गत बागलाण, दिंडोरी, इगतपुरी, कळवण, नाशिक, पेठ, सुरगाणा व त्र्यंबकेश्वर या आठ तालुक्यांचा समावेश आहे. तसेच अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक-२ अंतर्गत अहमदनगर जिल्ह्यातील संपूर्ण तालुके तसेच नाशिक जिल्हयातील मालेगाव, देवळा, चांदवड, नांदगांव, निफाड, येवला व सिन्नर या आठ तालुक्यांचा समावेश आहे. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक अंतर्गत एकूण ९०८ तसेच नाशिक-२ अंतर्गत १०२१ इतकी प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यापैकी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक अंतर्गत एकूण १७२ प्रकरणे तसेच नाशिक-२ अंतर्गत १९० प्रकरणे ही ५ वर्षावरील प्रकरणे प्रलंबित आहेत.
(३) व (४) आदिवासी विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र तातडीने मिळावे यासाठी समिती स्तरावर प्रकरणांची विगतवारी करुन व पाठपुरावा करुन प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही समितीकडून करण्यात येते. शासन आणि आयुक्त कार्यालयाकडून समित्यांकडील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत नियमित समिती कार्यालयाचा साप्ताहिक आढावा घेण्यात येतो. त्याचप्रमाणे समितीकडील प्रलंबित प्रकरणे "गती अभियान" अंतर्गत निकाली काढण्यात येत आहेत. दिनांक ०१.०५.२०१६ पासून समितीचे कामकाज etribevalidity.mahaonline.gov.in वर etribe validity "आदि प्रमाण प्रणाली" या संगणकीय प्रणालीव्दारे सुरु करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात वन्यप्राण्यामुळे निष्पाप नागरिकांचे सर्वाधिक बळी गेल्याबाबत

**(२२) ६९४३७ (२४-०८-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या वन विभागाने मानव वन्यजीव संघर्ष व उपाययोजना नावाची अधिकृत टिप्पणी माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केले असून सन २०१९ ते २०२२-२३ मध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात सर्वाधिक व्यक्तींचा वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे बळी गेल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी मानवी वस्तींत होणाऱ्या वन्यप्राण्यांच्या वावर रोखण्यासाठी व निष्पाप नागरिकांचे बळी थांबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०५-२०२४) :** (१) चंद्रपूर जिल्ह्यात वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात सन २०१९ मध्ये २५, सन २०२० मध्ये २१, सन २०२१ मध्ये ३३ व सन २०२२ मध्ये ४३ मनुष्य हानीच्या घटना झाल्या असून प्रस्तुत प्रकरणांमध्ये प्रचलीत शासन निर्णयानुसार एकूण रु. २००५.०० लक्ष इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

गडचिरोली जिल्ह्यात वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात सन २०१९ मध्ये ०१, सन २०२० मध्ये ०७, सन २०२१ मध्ये १७ व सन २०२२ मध्ये २९ मनुष्य हानीच्या घटना झाल्या असून प्रस्तुत प्रकरणांमध्ये प्रचलीत शासन निर्णयानुसार एकूण रु. ८९०.०० लक्ष इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(२) मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- उन्हाळयात वन्यप्राण्यांना वनातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता वनतलाव, खोदतळे, कृत्रिम पाणवठ्यांची निर्मिती करण्यात येते व त्यामध्ये बारमाही पाणी उपलब्ध राहील याची काळजी घेण्यात येते.
- वनलगत असलेल्या गावांमध्ये मानव वन्यप्राणी संघर्षाच्या वेळी घ्यावयाच्या खबरदारीबाबत जनजागृती करण्यात येते.
- वन्यप्राण्यांमुळे अतिप्रसंग उद्भवल्यास जलद बचाव पथकाच्या (Rapid Rescue Unit) सहाय्याने प्रचलित नियमातील तरतुदीनुसार सदर वन्यप्राण्यास जेरबंद करुन नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात येते.
- नैसर्गिक भक्ष्य असलेल्या तृणभक्षी वन्यप्रण्यांना वनातच गवत / चारा उपलब्ध होण्याकरीता कुरण विकासाची कामे करण्यात येतात.
- वन्यप्राण्यांमुळे शेतपिकांचे, पशुधनाचे नुकसान तसेच मन्युष्य जखमी किंवा मृत्युमुखी पडल्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई अदा करण्यात येते.
- वन्यप्राण्यांनी केलेल्या नुकसानीची भरपाई अदा करण्याकरीता उणे (-) प्राधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
- वनालगतच्या ग्रामस्थांचे वनावरील अवलंबत्व कमी व्हावे यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना राबविण्यात येत असुन त्यात एल.पी.जी. गॅस पुरवठा, बायोगॅस, र्निधुर चुली, सोलर दिवे इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील महसूल व कृषी विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये अनियमितता होत असल्याबाबत**

**(२३) ७०२६३ (१२-०९-२०२३). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महसूल व कृषी विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये अनियमितता होत असल्याने, लोकप्रतिनिधींनी मुख्यमंत्री यांच्याकडे यासंदर्भात चौकशी करण्याची लेखी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०६-२०२४) :** (१) व (२) राज्यात महसूल व कृषी विभागातील अधिका-यांच्या बदल्या संबंधित नागरी सेवा मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार आणि सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने करण्यात आलेल्या आहेत. कृषी विभागातील अधिका-यांच्या बदल्यांमध्ये अनियमितता होत असल्याबाबत लोकप्रतिनिधींकडून कोणतीही लेखी अथवा तोंडी तक्रार त्याबाबत चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. महसूल विभागातील अधिका-यांच्या बदल्या नागरी सेवा मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार आणि सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने करण्यात आल्याने त्यासंदर्भात चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मनमाड (जि.नाशिक) येथील तलाठी कार्यालयाची इमारत अत्यंत जीर्ण**
**झाली असून मोडकळीस आल्याबाबत**

**(२४) ७०४३८ (२५-०८-२०२३). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड (जि.नाशिक) येथील तलाठी कार्यालयाची इमारत अत्यंत जीर्ण झाली असून मोडकळीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी सुसज्ज अशी नवीन वास्तू बांधून देण्यात यावी अशी मागणी स्थानिक नागरीकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कार्यालयाच्या इमारतीच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मनमाड, जि. नाशिक येथील तलाठी कार्यालयाची इमारतीचे बांधकाम हे सन १९३१ साली झालेले असून सद्य:स्थितीत सदर इमारतीमध्ये तलाठी कार्यालय कार्यरत आहे. सदर कार्यालय मोडकळीस आल्याने त्या ठिकाणी नवीन इमारत बांधण्याकरीता कार्यकारी अभियंता, (पूर्व विभाग) सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांचेकडील अंदाजपत्रक जिल्हाधिकारी, नाशिक यांच्यामार्फत शासनास प्रस्ताव सादर करण्याची बाब कार्यवाहीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### भिवंडी येथे दहा लाखांचा खैराच्या लाकडाचा साठा जप्त केल्याबाबत

**(२५) ७०६८५ (११-०९-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील पडघा वनपरिक्षेत्राच्या हद्दीत असलेल्या बोरिवली गावात वनविभागाने छापा टाकून १० लक्ष रुपयाचे खैराचे लाकूड दिनांक २२ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०५-२०२४) :** (१) दिनांक २२ जून, २०२३ रोजी मौजे, बोरीवली, ता. भिवंडी जि. ठाणे येथे पोलीस अधिकारी/कर्मचारी व वनविभाग अधिकारी /कर्मचारी यांच्याकडून संयुक्तीक छापा टाकून खैर सोलीव तुकडे-११० किंमत -९,८१९/- तसेच खैर बिगर सोलीव तुकडे-३६५ किंमत-१,०१,४२०/- जप्त करुन विक्री आगार पडघा येथे ठेवण्यात आलेले आहे.
(२) या प्रकरणी वन विभाग व पोलीस यांनी एकत्रित संयुक्तिक केलेली कार्यवाही असल्याने सदर प्रकरणी वेगळयाने वनगुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. दिनांक २२ जून २०२३ रोजी पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी कारवाई केल्याने सदरील कारवाईची चौकशी ही पोलीस प्रशासनाकडून करणेत येत असल्याने सदरचे प्रकरण आजपर्यंत या विभागाकडे वर्ग करण्यात आलेले नाही. सदरची घटना निदर्शनास येताच तात्काळ सर्व पडघा वनक्षेत्रातील नियतक्षेत्राची तपासणी वनपाल यांचेमार्फत करण्यात आलेली असून, पडघा वनपक्षेत्रात अशा प्रकारची खैराची तोड आढळून आलेली नाही. अर्थात बोरवली येथे जप्त खैर माल हा पडघा वनपरिक्षेत्राच्या बाहेरुन अथवा परराज्यातून या ठिकाणी आणला जात असल्याची शक्यता लक्षत घेऊन पोलिस विभाग त्यादृष्टीने तपास करत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

### अमरावती जिल्ह्यातील मेळघाटातील नद्या कोरड्या झाल्याने वन्यप्राण्यांना पाण्यासाठी करावी लागत असलेली भटकंती

**(२६) ७०९४९ (२७-०८-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील पर्यावरणाच्या असंतुलनामुळे मेळघाटातील बारमाही वाहणाऱ्या तापी, सिपना, गडगा, खंडू, खापरा, डवाल या नद्यांचे पात्र कोरडे झाल्याने त्या परिसरातील जंगलातील वन्य प्राण्यांना पाण्याकरीता सर्वत्र भटकंती करावी लागत असल्याचे दिनांक ३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी नैसर्गिक साधनसंपत्तीने परिपूर्ण असलेल्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होत असलेली वृक्षतोड वा साठवण बंधाऱ्यांचे योग्य नियोजन व देखभाली अभावी सुरु असलेली दुरवस्था यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या भागात वृक्ष लागवड, पाण्याचे संवर्धन, जलसंधारण आदि कामे करुन येथील नद्यांना बारमाही पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०५-२०२४) :** (१), (२) व (३) मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वन्यजीव विभागामधील क्षेत्रातून वाहणाऱ्या तापी, सिपना, गडंगा, खंडु, खापरा व डवाल नद्यांची पात्रे दरवर्षी उन्हाळयाच्या शेवटी कोरडे होतात. तथापि, सदर नद्यांच्या पात्रातील डोहात बऱ्याच ठिकाणी पावसाळयाच्या सुरुवातीपर्यत पाणी साचलेले दिसून येते.

वन्यप्राण्यांना विशेषत: उन्हाळयात वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता मेळघाट वन्यजीव विभागामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वनक्षेत्रात ठिकठिकाणी कृत्रीम पाणवठे तयार करण्यात आले असून त्यामध्ये बोअर वेल, सोलर पंपद्वारे तसेच टॅन्करद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो.
- व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील वनतळी, जलशोषकचर, सलग समतलचर, समपातळी बांध, पाणवठ्यातील गाळ काढून जल व मृद संधारणाची कामे करण्यात येतात.
- डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना अंतर्गत पाणवठे तयार करुन गावातील पाळीव प्राण्याकरीता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येते.

मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती अंतर्गत सन २०२० मध्ये ४०११, सन २०२१ मध्ये २०२१ व जानेवारी २०२२ ते एप्रिल, २०२३ पर्यत २०९६ इतक्या वृक्षांची तोड झाल्याचे निदर्शनास आले आहे. अशा गुन्हे नोंदवून माल जप्त करण्याची कार्यवाही करण्यात येते.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील गावांमध्ये संयुक्त वनव्यवस्थापन समित्या स्थापन करण्यात आल्या असून त्यांच्या माध्यमातून वनसंरक्षण व संर्वधनास स्थानिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड शहरातील पीआर कार्डच्या अनियमिततेबाबत**

**(२७) ७१४२८ (०४-०९-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड शहर नगरपरिषद व ग्रामीण भागात हद्दवाढ मिळालेल्या शहरामध्ये पीआर कार्डच्या बाबतीत अनियमितता असल्याच्या अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित कार्यालयातील अधिकारी यांच्या संदर्भातील तक्रारी असतांना देखिल संचिका गहाळ करणे, या विषयाशी संबंधित असलेले कागदपत्राचे पुरावे नष्ट करणे व बोगस पीआर कार्ड निघण्यासाठी जी खासगी यंत्रणा कार्यरत आहे त्या लोकांशी संगणमत करणे यासारख्या बाबी सातत्याने आढळून येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बीड शहरातील मोंढा विभाग, कॅनॉल रोड, जुना धानोरा रोड, इंदिरानगर परिसर, हाऊसिंग कॉलनी, बीड खोड तरफ, गिराम तरफ, पिंगळे तरफ, बोबडे तरफ व इतर ज्या जमिनीवरील जागा महसुल विभागाने नगरविकास विभागाकडे वर्ग केलेल्या आहेत त्या दोन्ही बाजुची स्तरनिहाय व झालेल्या अनियमिततेची खातेनिहाय चौकशी

करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर चौकशी होत असतांना किमान दहा ते पंधरा वर्षापासूनच्या वर्षनिहाय संचिका व कागदपत्राची चौकशी व्हावी व झालेल्या अनियमितेमुळे विभागाचे नाव खराब होऊ नये तसेच नागरिकांची याद्वारे फसवणुक होऊ नये याबाबत खबरदारी घेण्याबाबत पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी सत्वर कार्यवाही होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) हे खरे आहे.
(६) बीड शहर नगर भूमापन हद्दीतील नगर भूमापन करतेवेळी झालेल्या अनियमिततेस अनुसरून १८५ सर्व्हे नंबरमध्ये सर्व्हेचे काम करणे अपेक्षित असून यामध्ये सुमारे ६०००० मिळकतीचे सर्व्हेक्षण करावयाचे आहे.

उप अधिक्षक भूमि अभिलेख, बीड कार्यालयाचे आस्थापनेवर कर्मचारी संख्या अपूरी असल्याने तसेच कार्यालयात प्राप्त होणारी शेतक-यांची दैनंदिन जमीन मोजणी कामे, कोर्ट कमिशन, कोर्ट वाटप, राष्ट्रीय महामार्गाचे मोजणी काम, रेल्वे संपादनाची कामे मोठया प्रमाणात प्रलंबित असल्याने सदर कामास विलंब झाला आहे.

भूमि अभिलेख विभागात सध्या अर्बन स्वामित्व योजना प्रायोगीक तत्वावर सुरु असुन त्याचप्रमाणे सदरचे काम ड्रोन सर्व्हेव्दारे केल्यास कमी वेळेत व कमी मनुष्य बळात होईल. त्यानुसार बीड शहरातील पी. आर. कार्डच्या अनियमिततेबाबत ड्रोनव्दारे मोजणी केल्यानंतर (G.T.) चौकशीचे काम करुन घेणे बाबतचा नियोजित कालबध्द कार्यक्रम जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड यांचेकडून तयार करण्यात आलेला आहे.

---

## राज्यातील विदर्भात शासनाने राष्ट्रीय शेतकरी आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत

**(२८) ७१९०४ (११-०२-२०२४). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील व विशेषतः विदर्भात सन २००४ मध्ये शेतकरी आत्महत्या वाढल्या होत्या त्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या उपाययोजनांसाठी डॉ.एम एस स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी आयोग नेमण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या डॉ.स्वामीनाथन आयोगाने माहे ऑक्टोबर, २००६ मध्ये वा त्यादरम्यान केंद्र शासनाला अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन आयोगाच्या प्रमुख शिफारशी काय आहेत व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (११-०६-२०२४) :** (१) होय, खरे आहे.
(२) होय, खरे आहे.

(३) डॉ. एम.एस. स्वामीनाथन आयोगाच्या प्रमुख शिफारशींपैकी २१ शिफारशी कृषि विभागाशी संबंधित असून त्या पुढीलप्रमाणे आहेत.-

१. युवकांना कौशल्य आधारित प्रशिक्षण देणे.

२. पंचायतीच्या इच्छुक निवडलेल्या सदस्यांचे प्रशिक्षण व शेतकऱ्यांना दर्जेदार सल्ला/सेवा पुरविणे.

३. पाण्याची कमतरता असलेल्या भागातील उच्च मूल्य पीक पध्दतीस प्रोत्साहित करणे.

४. बागायती भागात बहुपीक आणि आंतरपिकाद्वारे पीकांची घनता वाढविणे आणि प्रति युनिट पाण्याच्या वापराची कार्यक्षमता वाढविणे.

५. पर्यावरणीय संतुलन, जैव-सेंद्रिय पदार्थ व अजैविक खतांचा एकत्रित वापर आणि कृषि-रसायनांचा नियंत्रित वापराबाबत शेतकऱ्यांच्या ज्ञानामध्ये भर घालणे.

६. पिक विविधता (Crop Diversification) आणणे.

७. भात पिकणाऱ्या क्षेत्रामध्ये उच्च मूल्याच्या संकरित तांदळाच्या उत्पादनात वाढ करणे.

८. पिंकाचे उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर उच्च प्रतीचे प्रक्रीयायुक्त प्रमाणित/सत्यप्रत बियाणे कमी दरात उपलब्ध करणे.

९. माती परीक्षण आधारित सल्लासह माती आरोग्य पत्रिका देणे व माती परीक्षणानुसार जिल्हा पातळीवरील मातीचे सुपीकता नकाशे नियमितपणे तयार करुन अद्यावत करणे.

१०. जमीन आरोग्याविषयी जागरुकता वाढविणे.

११. फोर्टीफेड व कोटेट खतांचे उत्पादन आणि फलश्रुत खत व जैव खतांचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे.

१२. खत वितरण संनियंत्रण प्रणालीद्वारे खतांच्या गट स्तरापर्यंत हालचालींचे निरीक्षण सुनिश्चित करणे.

१३. कृषि उत्पादनांमध्ये कीटकनाशकांच्या उर्वरीत अंश गुणवत्तापूर्वक व सुधारित करण्यासाठी कृषि उत्पन्न बाजार समितीमधून नमुने तपासणे.

१४. गुणवत्तापूर्वक कीटकनाशके तपासणीसाठी पायाभूत सुविधांचा आराखडा तयार करणे.

१५. जिल्हा/तालुकापातळीवरील महत्वाच्या पिकांसाठी व उत्पन्नासाठी बचत गट/सहकारी संस्थांना प्रोत्साहन देणे.

१६. कृषि तंत्रज्ञान आधारित आज्ञावली तयार करणे.

१७. शेतकऱ्यांचा गट तयार करणे, विशेषत: लहान सीमांत आणि महिला शेतकऱ्यांना क्षमताबांधणीने पाठबळ देणे.

१८. शेतकऱ्यांना स्वयंसहाय्यता गटामार्फत सक्षम करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून प्रशिक्षण देणे व क्षमता बांधणीसाठी फिरता निधी उपलब्ध करुन देणे.

१९. प्रगतीशील शेतकऱ्यांनी राबविलेल्या नाविन्यपुणे उपक्रमांना राज्य/देशपातळीवर पुरस्कार देवून सन्मानित करणे.

२०. राज्यात राबविल्या जाणाऱ्या निरनिराळया योजनांचे एकत्रिकरण व अंमलबजावणीचा आढावा सभेमध्ये महत्वाच्या संबंधित खात्याचा समावेश करणे.

२१. प्रत्येक जिल्हयाकरिता मार्गदर्शक सूचनांप्रमाणे स्थानिक उपलब्ध संसाधनाचा विचार करुन स्वतंत्र सर्वंकष जिल्हा कृषि आराखडा तयार करावा व प्रभावी संनियंत्रण करणे. सदर मुद्यांच्या अनुषंगाने विभागाकडून योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### आदिवासी विकास विभागात शिक्षकांकडून विद्यार्थ्यास बेदम मारहाण केल्याबाबत

**(२९) ७१९८० (०८-०२-२०२४). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कामण (ता.डहाणू, जि.पालघर) येथे आदिवासी विकास विभाग डहाणू प्रकल्पांतर्गत येणाऱ्या अण्णासाहेब धामणे अनुदानित माध्यमिक आश्रम शाळेतील नितीन धनजी मागी (वय वर्षे १४) या आठवीच्या विद्यार्थ्याला आश्रमशाळेच्या अधिक्षक व शिक्षकाकडून (श्री.पृथ्वी बोरसे) यांनी दिनांक २ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास रात्रौ १० वाजता बेदम मारहाण केल्यामुळे त्याच्या बरगडीला दुखापत झाल्याने त्यांच्यावर धुंदलवाडी येथील रुग्णालयात उपचार सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू विद्यार्थ्याला अमानुष मारहाण केल्यानंतर दवाखान्यात नेवून त्यांच्यावर उपचार करुन त्याला रामपूर (वरठापाडा) डहाणू येथे घरी सोडल्याने दहा दिवस त्याच्यावर कोणतेही उपचार न केल्यामुळे त्याची प्रकृती खालावली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समाजिक कार्यकर्ते श्री.चंद्रकांत वाघारे यांनी हा प्रकार निदर्शनास आणून संबंधित मारहाण करणाऱ्या अधिक्षक व शिक्षकांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी श्री.नरेंद्र संखे आदिवासी प्रकल्प शिक्षण विस्तार अधिकारी, डहाणू यांच्याकडे लेखी तक्रार करुन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित दोषींविरोधात कारवाई करण्याकरिता व राज्यातील आश्रमशाळेत विद्यार्थ्यांवर होणारे अमानुष हल्ले, विद्यार्थ्यांचे वाढते मृत्यू प्रकरण थांबविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०५-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

आश्रमशाळेत घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू यांनी दिनांक ११.०९.२०२३ रोजी चौकशी समिती गठीत केली.

सदर चौकशी समितीने विद्यार्थ्यास प्रत्यक्ष भेट देऊन त्याच्या पालकांना घडलेल्या घटनेविषयी विचारणा केली असता, सदर विद्यार्थ्याने श्री. पी. पी. बोरसे, अधिक्षक यांनी त्याच्या कंबरेत लाथ मारल्याने त्या ठिकाणी दुखत असल्याने तो वर्गात बसला नाही. ही घटना त्याच्या लहान बहीणीने पालकांना संपर्क करुन सांगितल्यानंतर विद्यार्थ्याचे पालक शाळेत आले व सदर घटना शाळा प्रशासनास सांगितल्यानंतर शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यावर प्राथमिक आरोग्य केंद्र, कामण येथे उपचारासाठी घेऊन गेले.

(२) हे खरे नाही,

कु. नितीन धनाजी मागी या मारहाण करण्यात आलेल्या विद्यार्थ्याला शाळेमार्फत प्राथमिक आरोग्य केंद्र कामण येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. सदर दवाखान्यामधून पुढील उपचारासाठी वसई विरार शहर महानगर पालिका रुग्णालय येथे उपचारासाठी नेण्यात आले. त्याठिकाणी विद्यार्थ्याचे एक्स-रे काढण्यात आले व औषोधोपचार देऊन सोडण्यात आले. त्यानंतर सदर विद्यार्थ्यास शाळेत परत आणण्यात येत होते. परंतू विद्यार्थ्याच्या पालकांनी मुख्याध्यापक यांना लेखी निवेदन देऊन विद्यार्थ्यास स्वगावी नेऊन तेथे स्थानिक हाडवैद्यकडून उपचार सुरु केले. सदर कालावधीत शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्याच्या उपचारासंदर्भात त्याच्या पालकांशी संपर्क ठेवला व दिनांक १०.०९.२०२३ रोजी वेदांत रुग्णालय धुंदलवाडी, ता. डहाणू, जि. पालघर व उपजिल्हा रुग्णालय कासा येथे सदर विद्यार्थ्यांवर शाळा व्यवस्थापनाने उपचार केले. सदर विद्यार्थ्याची घरी देखभाल करण्यासाठी शाळा प्रशासनाने विद्यार्थ्याच्या घरी दररोज जाण्यासाठी शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्याची नियुक्ती केली होती.

(३) हे खरे नाही,

(४) याप्रकरणी प्रकल्प स्तरावर केलेल्या चौकशीअंती दोषी आढळलेले श्री. पी. पी. बोरसे, अधिक्षक यांना संस्थेने सेवेतून कमी केलेले आहे. तसेच दोषीविरुध्द वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत नायगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे व पुढील तपास सुरु आहे.

आश्रमशाळा संहिता-२०१९ मधील प्रकरण २.३ मधील नियम क्र.२.३.२ (ख) नुसार आश्रमशाळेतील मुलांबाबत गैरवर्तन, अत्याचार झाल्यास त्याबाबत ताबडतोब पिडीत मुला/मुलीस धीर देऊन त्याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यास कळवून त्यांच्या मार्गदर्शनाखील पोलीस ठाण्यात तसेच प्रकल्प स्तरावरील समन्वय समितीस कळविण्यात यावे, अशी तरतूद

आहे.

शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे मृत्यू रोखण्यासाठी व त्यावर उपायोजना सुचविण्यासाठी डॉ. सुभाष साळुंखे, सेवानिवृत्त महासंचालक, आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.शाआशा. २०१६/ प्र.क्र. १२५/का.१३, दिनांक ३० मे, २०१६ अन्वये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सुचविलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने दिनांक २८ डिसेंबर,२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये विद्यार्थी मृत्यु बाबत चौकशी करण्याकरीता आपतकालीन आढावा गट, वैद्यकीय सामाजिक आढावा समिती तसेच जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. विद्यार्थी मृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी विद्यार्थ्यांचे समुपदेशन, आरोग्यसुविधा, प्रथमोपचारपेटी तसेच वैद्यकीय दृष्टीने डॉ. साळुंके समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करणेबाबत सूचना दिल्या जातात. शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्याचे शाळेच्या ताब्यात असताना मृत्यू झाल्यास मृत विद्यार्थ्याच्या शवविच्छेदन अहवालानुसार दोषी असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी तसेच संस्था चालक यांना कारणे दाखवा नोटीस बजावून नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यात सांस्कृतिक धोरण पुनर्विलोकन समितीच्या झालेल्या बैठकीबाबत**

**(३०) ७१९८१ (१०-०२-२०२४). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सांस्कृतिक धोरण पुनर्विलोकन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुध्दे यांच्या अध्यक्षतेखाली प्रभादेवी येथील रविंद्र नाटयमंदिरातील करिश्मा सभागृहात सांस्कृतिक धोरण सन २०२३ च्या अनुषंगाने दिनांक ११ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास सर्व संबंधित अधिकारी व विविध कला क्षेत्रातील कलावंत यांच्या समवेत एक बैठक घेतली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू बैठकीत रंगकर्मी यांनी आपल्या विविध मागण्या शासनाकडे मांडल्या आहेत तसेच दिनांक १२ नोव्हेंबर २०२० रोजी वा त्यासुमारास नाटयपरिषदेने सरकारला दिलेल्या पत्राची आठवणही करून देण्यात आली आहे व सदरहू प्रलंबित मागण्याचा समावेश सांस्कृतिक धोरणात करण्याची मागणीही केलेली आहे तसेच राज्यात अंमलात येणाऱ्या नविन सांस्कृतिक धोरणात सरकारने लोक कलावंताच्या हिताचे निर्णय घ्यावेत, अशीही मागणी बैठकीत करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने माहिती घेऊन प्रलंबित मागण्यांचा समावेश नवीन सांस्कृतिक धोरणात करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कार्यवाही सुरु आहे.
(३) सदरील धोरणाच्या अंमलबजावणीचा फेरआढावा घेण्यासाठी शासनाने दिनांक ९ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित केलेली आहे. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य हे या समितीचे सन्माननीय अध्यक्ष असून श्री. विनय सहस्त्रबुध्दे हे या समितीचे सन्माननीय कार्याध्यक्ष आहेत. कारागिरी, भाषा, साहित्य आणि ग्रंथ व्यवहार, दृश्यकला, गड किल्ले, लोककला, संगीत, रंगभूमी, नृत्य, चित्रपट, भक्ती संस्कृती या विभागांकरिता पुरेसे प्रतिनिधित्व देण्यासाठी तसेच सदर धोरण समितीचे कामकाज व्यापक व परिणामकारक होण्यासाठी मूळ समितीला सहकार्य म्हणून दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये उपसमिती नेमण्यात आलेली आहे. सदर समितीचे कामकाज पूर्ण झालेले असून याबाबत अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील तहसीलदार कार्यालयाच्या इमारतीची झालेली दुरवस्था

**(३१) ७२६०० (०८-०२-२०२४). अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील तहसीलदार कार्यालयाच्या इमारतीची दुरावस्था झाली असून तेथील कर्मचारी जीव मुठीत घेऊन काम करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तहसील कार्यालयात शालेय विद्यार्थ्यांचे दाखले, प्रतिज्ञापत्र, विविध प्रकारच्या सुनावण्या, विविध योजना व पुरवठा शाखा इत्यादी विविध कामांसाठी तालुक्याच्या दुर्गम भागातून नागरिक, शेतकरी व विद्यार्थी यांची वर्दळ कायम असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तहसील कार्यालय इमारतीच्या नुतनीकरणाचा प्रस्ताव मागील दहा वर्ष प्रलंबित असल्यामुळे तेथे अभ्यागत कक्ष, स्वच्छता गृह, शौचालय व पाण्याची व्यवस्था इत्यादी मुलभूत सुविधाही नसल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार तालुक्यातील तहसील कार्यालयाच्या इमारतीचे नुतनीकरण तसेच सोयी सुविधांकरिता कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०६-२०२४) :** (१) (२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.

(४) शहापूर तालुक्यात प्रशासकीय इमारत बांधण्याकरीता मौजे गोठेघर, ता. शहापूर येथील स.नं. ४१, ४१अ/१, ४२/२ब,४१/२क,४१/२ड एकूण क्षेत्र ३.१४.० हे. आर यापैकी ०.७७.० हे.आर ही जमीन जलसंपदा विभागाकडून महसूल विभागाकडे विनामुल्य हस्तांतरण करणेकरीता नियामक मंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असून जलसंपदा विभागाची जागा इमारत बांधकामाकरीता महसूल विभागास उपलब्ध झाल्यानंतर पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात जुन्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी ना-हरकत प्रमाणपत्र सक्तीचे केल्याने मोठ्या प्रमाणात गैरकारभार होत असल्याबाबत

**(३२) ७३५८८ (११-१२-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जुन्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी गृहनिर्माण सोसायटीने सर्वसाधारण बैठकीत विकासकाच्या नियुक्तीसाठी सहकार निबंधकाना निमंत्रित करुन त्यांची उपस्थिती अनिवार्य व त्यांचेद्वारे ना-हरकत प्रमाणपत्र सक्तीचे केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रमाणपत्र देणेकामी मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असून सोसायट्यांची नाहक अडवणूक देखील होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ना-हरकत प्रमाणपत्र देताना संबंधित अधिकारी लाखो रुपये घेतल्याखेरीज सदर प्रमाणपत्र सोसायट्यांना देण्यात येत नसल्यामुळे निबंधकाना बैठकीस उपस्थित राहण्याची अट रद्द करण्याची मागणी मुंबई ग्राहक पंचायतीच्या वतीने सहकार विभागास व मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये व त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन रहिवाशांची अडवणूक व यात होत असलेला गैरव्यवहार थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१४-१२-२०२३) :** (१),(२),(३) व (४) ग्राहक पंचायतीने सहकार विभाग व मा. मुख्यमंत्री महोदयांकडे दिलेले निवेदन प्राप्त झाले नाही. तथापि, मुंबई ग्राहक पंचायतीने मा.उपमुख्यमंत्री महोदयांकडे दिलेले दिनांक ३१.०८.२०२३ चे निवेदन ई-ऑफीसव्दारे विभागास प्राप्त झाले असून त्याबाबत सहकार आयुक्त तथा निबंधक सहकारी संस्था यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींचा पुर्नविकास करण्याबाबत शासन निर्णय दिनांक ०४.०७.२०१९ रोजी निर्गमित केला आहे. त्यामध्ये विकासकाची निवड करण्यासाठी घेण्यात येणारी विशेष सर्वसाधारण सभा सहकारी संस्थांच्या निबंधक कार्यालयाच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत होण्यासाठी प्राधिकृत अधिकारी नियुक्त करण्याकरीता निबंधकाकडे सभासद यादीसह ७ दिवसात अर्ज सादर करावा. यावर निर्णय घेवून निबंधक प्राधिकृत अधिकारी यांची नेमणूक करतील अशी तरतूद आहे. तथापि ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत कोणतीही सूचना विभागामार्फत निर्गमीत करण्यात आली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी यांना स्वामित्व हक्क प्राप्त होण्याबाबत**

**(३३) ७४०८४ (१३-०२-२०२४). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ मधील कलम २ व ३ अन्वये गावांच्या सिमांतर्गत किंवा सिमाबाहेरील पारंपारिकरित्या गौण वनोत्पादन गोळा करणे, त्यांचा वापर करुन विल्हेवाट लावण्याचे अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी यांना स्वामित्व हक्क प्राप्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी विकास विभागाने सुध्दा अनुसूचित जमाती व वननिवासींना स्वामित्व हक्क प्राप्त असल्यामुळे आदिवासी क्षेत्रातील गौण उपज गोळा करण्याचे अधिकार ग्रामपंचायतींना देण्याबाबत वनविभागास पत्राने कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अर्जुनी-मोरगाव (जि.गोंदिया) तालुक्यातील नवेगावबांध क्षेत्रातील स्वामित्व हक्क प्राप्त ग्रामपंचायतींना संकलीत केलेले तेंदूपत्ता व वाहतूक करणारे वाहन वन विभागाचे अधिकाऱ्यांनी जप्त करुन त्यांचेवर गुन्हे दाखल केल्यामुळे सदर अन्यायकारक कार्यवाहीविरुध्द संबंधित ग्रामपंचायतचे पदाधिकारी १ जून पासून आमरण उपोषणावर बसले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भातील माहितीच क्षेत्रीय अधिकाऱ्यांना नसल्यामुळे त्यांनी चुकीची कारवाई करुन खोटी फौजदारी तक्रार दाखल केल्यामुळे संबंधित ग्रामपंचायतीचे नागरिकांवर अन्यायकारक कारवाई करणाऱ्यांना वनविभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०५-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वननिवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ नुसार अनुसूचित जमाती व वननिवासींना गावाच्या सिमांतर्गत किंवा सीमेबाहेर पारंपारीकरित्या गोळा केल्या जाणारे गौण वनौत्पादन गोळा करणे, त्याचा वापर करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे यासाठी स्वामित्व हक्क प्राप्त असल्याने आदिवासी विभाग दिनांक १२.२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये वनहक्क कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन होऊ नये याकरीता आवश्यक कार्यवाही करण्याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना आदिवासी विभागाकडून कळविण्यात आले आहे.

(३) हे खरे आहे.

सन २०२२ चे तेंदू हंगामात सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समिती (ग्रामसभा) परसटोला यांनी वनविभागाकडून वाहतुक परवाना न घेता त्यांचे स्तरावरुन वाहतूक परवाना निर्गमित करुन तेंदूपत्ता वाहतूक केल्याप्रकरणी १ ट्रक वनविभागाद्वारे ताब्यात घेऊन वनपरिक्षेत्र अधिकारी, गोठणगाव यांनी वनगुन्हा नोंदविला आहे. तसेच मा.प्रथम श्रेणी न्यायालय, अर्जुनी/मोर येथे सदर प्रकरणी न्यायप्रविष्ठ करण्यात आले होते. सदर प्रकरणी वन विभागाने केलेल्या कार्यवाहीच्या विरोधात नवेगावबांध येथे एकूण १२ व्यक्तींनी दिनांक ४.६.२०२२ पासून आमरण उपोषण सुरु केले होते. सदर उपोषण मागे घेण्यासाठी संबंधित लोकप्रतिनिधी वनविभागाचे क्षेत्रिय अधिकारी तसेच पोलीस अधिकारी, नवेगावबांध यांनी उपोषण स्थळी जाऊन उपोषणकर्त्यांची समजूत घालून उपोषणकर्त्यांना उपोषणपासून परावृत्त केल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

(४), (५) व (६) हे खरे नाही.

वनविभागाने अनुसुचित जमाती व इतर पारंपारीक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ आणि नियम २००८ व सुधारीत नियम २०१२, भारतीय वन अधिनियम, १९२७ महाराष्ट्र गौण वनोपज (व्यापाराचे नियमन) अधिनियम, १९६९ तसेच महाराष्ट्र गौण वनोपज (तेंदू व्यापाराचे विनियमन), नियम १९६९ तसेच महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक ३०.७.२०१३, १८.१.१९९१, २५.१.१९९३, २४.१.१९९४ मधील तरतूद व नियमांचे अधिन राहून कार्यवाही करण्यात येत असल्यामुळे वन अधिकारी यांचेविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी आरक्षणामध्ये धनगर जातींचा समावेश न करण्याबाबत

**(३४) ७४११२ (०८-०२-२०२४). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी आरक्षणामध्ये धनगर जातींचा समावेश करु नये याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व दोन्ही उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच मा.आदिवासी विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य व मुख्य सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव, आदिवासी विकास विभाग यांना माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच आदिवासी आरक्षणामध्ये धनगर समाजाला समाविष्ट करु नये, या मागणीकरिता आदिवासी आरक्षण बचाव संघर्ष समितीने दिनांक ७ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास मुंबई-नाशिक महामार्गावर तसेच राज्यातील अनुसूचित जमातीच्या लोकप्रतिनिधींनी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे आदिवासींची संस्कृती, परंपरा, राहणीमान, जीवनशैली, भौगोलिक परिस्थिती तसेच विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य असलेला व स्वतंत्र बोली भाषा असलेला हा समाज आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, धनगर व धनगड या दोन्ही भिन्न जाती असल्यामुळे धनगरांना अनुसूचित जातीचे आरक्षण देता येणार नाही, असा स्पष्ट सविस्तर अहवाल टिस (टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस) ने शासनाकडे दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, आदिवासी आरक्षण हा संविधानिक हक्क असून धनगर समाजाचा आदिवासी आरक्षणामध्ये समावेश करण्यात यावा म्हणून विविध संघटनांच्या माध्यमातून शासन स्तरावर वारंवार मागणी होत असल्याने आदिवासी समाज

आक्रमक झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०५-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३), (४), (५) व (६) धनगर समाजाचा अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये समावेश न करण्याबाबत विविध संघटना तसेच विविध लोकप्रतिनिधी यांची निवेदने प्राप्त झालेली आहेत.

धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांना दिनांक २२.०९.२०१५ रोजीच्या पत्रान्वये धनगर व धनगड जमातींचा संशोधन/सर्व्हेक्षण करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांनी दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ रोजी याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवाल पुढील निर्णयास्तव वरिष्ठ पातळीवर सादर करण्यात आला आहे.

---

## वरवणे (ता.पेण, जि.रायगड) शासकीय आश्रमशाळेतील शिक्षकाने केलेली आत्महत्या

**(३५) ७४३५९ (०९-०२-२०२४). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरवणे (ता.पेण, जि.रायगड) शासकीय आश्रमशाळेतील तासिका तत्त्वावर कार्यरत शिक्षक महादेव जानू वारगुडे यांनी वेतन मिळत नसल्याने विष प्राशन करुन आत्महत्या केल्याचा गंभीर प्रकार माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तासिका कर्मचाऱ्यांना कायम करण्याबाबत तसेच पगारात वाढ करण्याबाबत कार्यरत शिक्षकाने मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच शासकीय आश्रमशाळेतील तासिका तत्त्वावर कार्यरत शिक्षकांना कायम करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शिक्षक महादेव जानू वारगुडे यांच्या कुटूंबाला आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१३-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.
श्री. महोदव जानू वारगुडा, तासिका प्राथमिक शिक्षक पदावर दिनांक १३.०१.२०२० ते ३०.०४.२०२३ या कालावधीत शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, वरवणे, ता.पेण जि.रायगड येथे कार्यरत होते. या कार्यालयाच्या त्यांना देय असलेली तासीका मानधनाची रक्कम रु.२,६४,५०० /- अदा करण्यात आली आहे. व दिनांक १५.०९.२०२३ ते दिनांक २१.१०.२०२३ या कालावधीतील २४ दिवसांचे मानधन रु.१४,४२५/- शासकीय आश्रमशाळा, कादवण यांचेकडून अदा करण्यात आले आहे. अशी एकूण रु. २,७८,९२५/- इतकी मानधन रक्कम अदा करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय, ज्या शासकीय आश्रमशाळेतील तासिका/रोजंदारी तत्वावर कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी ज्यांची सेवा १० वर्षापेक्षा जास्त झाली आहे अशा कर्मचाऱ्यांची माहिती मागविण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राजुरा, कोरपना व जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील मंजुर कामे पूर्ण करण्याबाबत

**(३६) ७४७६६ (०९-०२-२०२४). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा, कोरपना व जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील माहे डिसेंबर, २०२१ च्या पुरवणी अर्थसंकल्प व मार्च, २०२२ च्या अर्थसंकल्पामध्ये लेखाशीर्ष ५०५४-५११७ अंतर्गत मंजुर असलेली विकास कामे अजूनही पूर्ण झाली नसल्याने रस्ते बाधीत परिसरातील व आदिवासी भागातील नागरिकांमध्ये असंतोष पसरला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र.१३१/२०२२ श्री.गोपाल लहांगे विरुद्ध महाराष्ट्र शासन मधील आदेशान्वये प्रशासकीय विभागांनी प्रकरणनिहाय विचार करुन मागे घेतलेल्या स्थगिती व्यतिरिक्त ज्या कामांच्या अंमलबजावणीस दिनांक १८ जुलै, २०२३ व २१ जुलै, २०२२ च्या मुख्य सचिवांच्या टिपणीन्वये आजही स्थगिती आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा कामांवरील स्थागिती शासनाने उठविण्यात आली असताना सुद्धा आदिवासी विकास विभागाने राजुरा, कोरपना व जिवती तालुक्यातील लेखाशीर्ष ५०५४-५११७ अंतर्गत मंजूर केलेल्या रस्ते व पुलांच्या कामांपैकी स्थागिती देण्यात आलेली कामे रद्द करण्याबाबतचा आदेश अजुनही काढलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन प्रश्न भाग १, २ व ३ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०३-०६-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) लेखाशिर्ष ५०५४ ५११७ अंतर्गत मंजूर करण्यात आलेली तथापि, निविदा प्रक्रिया न झालेली स्थगिती असलेली कामे दिनांक ०३/०३/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आली आहेत. त्यामध्ये चंद्रपूर जिल्हयातील राजूरा, कोरपना व जिवती या तालुक्यांमधील कामांचा देखील समावेश आहे.

तथापि, माहे मार्च, २०२३ ; जुलै, २०२३ व डिसेंबर, २०२३ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यासह इतर आदिवासी उपयोजना क्षेत्र असलेल्या जिल्हयांमध्ये रस्ते/पुल यांची कामे मंजूर करण्यात आली आहेत. त्यामध्ये चंद्रपूर जिल्हयामध्ये रु.१०७.७१ कोटी रकमेच्या ४१ कामांचा देखील समावेश आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### शिरुर भूमी अभिलेख कार्यालयाची इमारत कर्मचाऱ्यांना अपुरी पडत असल्याबाबत

**(३७) ७४९३० (०८-०२-२०२४). ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (पुणे) येथील भूमी अभिलेख कार्यालयातील रेकॉर्ड रुम तसेच कर्मचाऱ्यांना बसण्याकरिता इमारत अपुरी पडत असल्यामुळे काम करताना अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अभिलेख कार्यालयाचे कामकाज व्यवस्थित चालण्यासाठी सदर इमारत बांधण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे,

(२) व (३) भूमी अभिलेख कार्यालय, शिरुर येथील इमारत बांधकामाचा प्रस्ताव दिनांक ०५/०१/२०२४ रोजी कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, पुणे-१ यांच्याकडे सादर करण्यात आला असून सदर प्रस्ताव दिनांक

२४/०१/२०२४ रोजी जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्याकडे सद्य:स्थितीत कार्यवाहीत आहे.

सदर परिपूर्ण प्रस्ताव शासनस्तरावर प्राप्त होताच निधीची उपलब्धता व कामाची निकड विचारात घेऊन पुढील उचित कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यासाठी विविध कामासाठी ठेकेदार नेमले होते त्यांची देणी बाकी असल्याबाबत**

**(३८) ७४९६१ (१०-०२-२०२४).** : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किल्ले रायगड, (ता.महाड, जि.रायगड) येथे दिनांक २ व ६ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास शिवराज्याभिषेक दिन सोहळा राज्य शासनातर्फे करण्यात आला या सोहळ्यासाठी पाणीपुरवठा, मंडप उभारणी व हेलिपॅड उभारणे इ. विविध कामाचा ठेका ज्या ठेकेदारांना देण्यात आला होता त्या ठेकेदारांची देणी सुमारे ६ कोटी रुपये बाकी असल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड किल्ल्याचा मार्ग दाखवण्यासाठी दिशादर्शक फलके, सरकारी अधिकाऱ्यांसाठी अधिग्रहीत केलेल्या वाहनांचे भाडे, माहितीपट तयार करणे, घडी पुस्तिका, स्टिकर्स, स्मृतीचिन्ह, मुख्य कार्यक्रमाची पूर्व प्रसिद्धी व कार्यक्रमाचे व्हिडिओ शूटिंग इ.वर खर्च करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, याबाबत जिल्हा नियोजन समितीकडे स्थानिक प्रांताधिकारी श्री. ज्ञानोबा बानगुडे यांनी स्मरणपत्रे पाठवून अद्यापी ठेकेदारांना तीन महिने होऊनही पैसे न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) तसेच, या राज्याभिषेक सोहळा कार्यक्रमासाठी विविध कामाकरीता किती ठेकेदारांना ठेके देण्यात आले होते, त्यापैकी किती ठेकेदारांचे देणे बाकी आहे, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०५-२०२४) :** (१), (२), (३) व (४) "३५० वा शिवराज्याभिषेक सोहळा" या महोत्सवाच्या निमित्ताने किल्ले रायगड व पाचाड येथे विविध कार्यक्रम/उपक्रमांचे आयोजन करण्यास दिनांक ११ मे, २०२३ च्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी, रायगड यांना प्राधिकृत करण्यात आले. त्यानुसार, सदर सोहळ्यासाठी जिल्हाधिकारी, रायगड यांच्यामार्फत संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

श्री. ज्ञानोबा बानापुरे, उपविभागीय अधिकारी, महाड यांचेकडून जिल्हा नियोजन समितीकडे रुपये ४५,०१,११०/- इतक्या रकमेच्या खर्चाबाबत तोंडी पाठपुरावा करण्यात आलेला होता. त्यापैकी, जिल्हा नियोजन समितीने रुपये ३१,५०,०००/- इतका निधी वितरीत केलेला आहे.

तसेच, सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने सांस्कृतिक कार्य विभागाशी निगडीत बाबींसाठी विभागाच्या शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२३/प्र.क्र.३९१ (भाग-१)/सां.का.४, दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ अन्वये रुपये १६,०९,४८,०००/- इतका निधी वितरीत करण्यात आला.

उर्वरित आयोजन खर्च संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, जिल्हा नियोजन समिती इ. यांच्याकडून निधी उपलब्ध करण्याची कार्यवाही करणेबाबत दिनांक १५ मे, २०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, रायगड यांना कळविण्यात आले होते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जावसई (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) गावातील वन विभागाच्या मालकीच्या जागेत भूमाफियांनी असंख्य अनधिकृत बांधकामे केली असल्याबाबत**

**(३९) ७५०७५ (१३-०२-२०२४). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जावसई (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) गावातील अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील लक्ष्मी नगर व वन विभागाच्या मालकीच्या जागेत भूमाफियांनी असंख्य अनधिकृत बांधकामे केली असून त्या ठिकाणी वनपाल यांना माहिती देऊनही ते या अनधिकृत बांधकामावर कारवाई करत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच वनपाल श्री.वाळिंबे यांचे भूमाफियांशी काही संबंध वा संगनमत असल्याबाबत शासनाने वरिष्ठ अधिकाऱ्यांची नेमणूक करुन चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील वन विभागाच्या जागेवर कोणकोणत्या भूमाफियांनी किती अनधिकृत बांधकामे करण्यात आल्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०५-२०२४) :** (१) मौजे जावसई येथील अंतिम संपादित वन सर्व्हे क्र. ८९ पै. चे वनक्षेत्र नागरी वस्तीला लागून आहे. सदर वनक्षेत्रात नव्याने झालेल्या अतिक्रमणाबाबत रा.गु.क्र.१३/ई/२०२३, दिनांक ५.१०.२०२३ व रा.गु.क्र.१४/ई/२०२३, दिनांक ६.१०.२०२३ अन्वये वनगुन्हा नोंद करण्यात आला व दिनांक १०.१०.२०२३ रोजी ३ अतिक्रमणे निष्कासित करुन ७९२.५ चौ.मी. वनजमीन अतिक्रमण मुक्त करण्यात आली आहे.
(२) वनपाल श्री.वाळिंबे यांचे भूमाफियांशी संबंध व संगनमत असल्याबाबत निदर्शनास आलेले नाही.
(३) अंबरनाथ नगरपरिषदेच्या हद्दीतील वनक्षेत्रात पूर्वीपासून सुमारे १२९० अतिक्रमणे अस्तित्वात असून सदर अतिक्रमणांपैकी ५१ अतिक्रमणे निष्कासित करुन १३४८४.५ चौ.मी. क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आलेले आहे.
ठाणे जिल्ह्यातील शासकीय जमिनींवरील व वन जमिनींवरील अतिक्रमणासंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. १, ३५, ३६/२००७ मध्ये दिनांक २५.१०.२०१३ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार सदरची अतिक्रमणे निष्कासनाची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र भूषण पुरस्कार वितरण सोहळा दुर्घटना अहवालाबाबत

**(४०) ७५८४१ (१०-०२-२०२४). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.आदित्य ठाकरे (वरळी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील खारघर येथे सन २०२२ चा "महाराष्ट्र भूषण" पुरस्कार वितरण सोहळा हा दिनांक १६ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास झाला असून गर्दीमुळे उष्माघाताने १४ जणांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त सोहळयातील दुघर्टनची चौकशी करण्याकरिता दिनांक २० एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनाने एक सदस्यीय चौकशी समिती गठीत केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त समितीचा अहवाल सादर करण्याकरिता एका महिन्याची मुदतवाढ देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुदत संपल्यानंतरदेखील माहे नोव्हेंबर, २०२३ अखेरपर्यंत अहवाल प्राप्त न होण्याची कारणे काय आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०५-२०२४) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) शासनास अहवाल प्राप्त झाला असून शासनाने अहवाल स्वीकृत केला आहे व त्यानुषंगाने, महसूल व वन (पुर्नवसन) विभागास सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासींच्या उत्कर्षासाठी वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीबाबत**

**(४१) ७५९४६ (०९-०२-२०२४). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ हा माहे डिसेंबर, २००७ पासून लागू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अधिनियमाच्या कलम ३ (१) अन्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी यांना वैयक्तिक वा सामूहिक वनहक्क धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील आदिवासी बांधवांचा उत्कर्ष होण्याच्या उद्देशाने वनहक्क अधिनियमाची अंमलबजावणी करतेवेळी उद्देश ठेवला जातो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने सन २०१८-२०१९ ते सन २०२३-२०२४ या कालावधीतच राज्यातील एकूण किती वैयक्तिक व सामूहिक वन दावे मान्य केले तसेच आदिवासींसाठी मान्य केलेल्या वैयक्तिक व सामूहिक दाव्यांसाठी किती हेक्टर वनक्षेत्र मंजूर केले आहे,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०५-०६-२०२४) :** (१) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ राज्यात माहे डिसेंबर, २००७ पासून लागू आहे.

(२) व (३) होय,

(४) सन २०१८-१९ ते सन २०२३-२४ या कालावधीतील वैय्रक्तिक व सामूहिक मान्य वनहक्क दावे,अपिल व वनक्षेत्राचा तपशिल

| **अ.क्र.** | **सन** | **दाव्यांचा प्रकार** | **जिल्हास्तरीय समिती** | |
|---|---|---|---|---|
| | | | **मान्य (दावे+अपिल)** | **मंजुर केलेले वनक्षेत्र (हे.आर)** |
| १ | २०१८-२०१९ | वैयक्तिक | २६२३० | २९२५२.९१ |
| | | सामुहिक | १८७ | ७४८७८.२२ |
| २ | २०१९-२०२० | वैयक्तिक | ३३७४ | ३२००.६२ |
| | | सामुहिक | ११५ | ११७३८.५४ |
| ३ | २०२०-२०२१ | वैयक्तिक | ३८३६ | ३८३९.२७ |
| | | सामुहिक | १६३ | ५५६६४.५६ |
| ४ | २०२१-२०२२ | वैयक्तिक | ४२६८ | ८०६०.४ |
| | | सामुहिक | ३२५ | ५४२३३.५४ |
| ५ | २०२२-२०२३ | वैयक्तिक | ३६८२ | १७९८.४८ |
| | | सामुहिक | २२५ | ४९७९५.१३ |
| ६ | २०२३-२०२४ माहे फेब्रुवारी, २०२४ पर्यंत | वैयक्तिक | २३०० | २१२६.२१ |
| | | सामुहिक | ९० | ११८२२.९ |
| | **एकुण** | **वैयक्तिक** | **४३६९०** | **४८२७७.८९** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | **सामुहिक** | **११०५** | **२५८१३२.८९** |
| सन २०१८-१९ ते सन २०२३-२४ या कालावधीतील आदिवासींसाठी मान्य केलेल्या वैयक्तिक व सामूहिक मान्य वनहक्क दावे व वनक्षेत्राचा तपशिल | | | | |
| **अ.क्र.** | **सन** | **दाव्यांचा प्रकार** | **जिल्हास्तरीय समिती** | |
| | | | **मान्य (दावे+अपिल)** | **मंजुर केलेले वनक्षेत्र (हे.आर)** |
| १ | २०१८-२०१९ | वैयक्तिक | २५६९७ | २९७७५.२६ |
| | | सामुहिक | १८५ | ६४२८०.९६ |
| २ | २०१९-२०२० | वैयक्तिक | ३११२ | ३०९५.६५ |
| | | सामुहिक | ५५ | ३४०४.७७ |
| ३ | २०२०-२०२१ | वैयक्तिक | ३६०९ | ३५०७.६५ |
| | | सामुहिक | १५५ | ५५१५४.३८ |
| ४ | २०२१-२०२२ | वैयक्तिक | ३८९० | ७८३९.३५ |
| | | सामुहिक | २७३ | ४८०६३.३८ |
| ५ | २०२२-२०२३ | वैयक्तिक | ३१७८ | १४५१.८४ |
| | | सामुहिक | २१४ | ४५८७५.११ |
| ६ | २०२३-२०२४ माहे फेब्रुवारी, २०२४ पर्यंत | वैयक्तिक | १७५८ | १७८७.५३ |
| | | सामुहिक | ४० | ३२९६.८३ |
| | **एकुण** | **वैयक्तिक** | **४१२४४** | **४७४५७.२८** |
| | | **सामुहिक** | **९२२** | **२२००७५.४३** |

(५) वनहक्क कायदा अंमलबजावणीच्या अनुषंगाने उपविभागीय व जिल्हास्तरीय वनहक्क समिती स्तरावर प्राप्त दावे व अपिल यांच्यावर कार्यवाही करण्यात येते. जिल्हास्तरीय वनहक्क समितीद्वारा वनहक्क दावे व अपिले निकाली काढण्यात येतात.

राज्यात वनहक्क कायदा अंमलबजावणीच्या अनुषंगाने शासन स्तरावरून राज्यस्तरीय संनियंत्रण समितीच्या वेळोवेळी होणाऱ्या बैठकांमध्ये आढावा घेण्यात येतो.

तसेच राजभवन यांचेकडुन आयोजित बैठकींव्दारे संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांचा प्रलंबित वनहक्क दाव्यांचा आढावा घेण्यात येऊन प्रलंबित वनहक्क दावे व अपिल निकाली काढण्यासाठी वेळोवेळी सुचना देण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्ह्यातील पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजनेंतर्गत केळी पिकांची नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(४२) ७६१३६ (१३-०२-२०२४). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजना सन २०२२-२३ अंतर्गत सुमारे ७८ हजार केळी उत्पादक शेतकऱ्यांनी केळी पिकाचा विमा काढलेला असून लाभार्थी शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम विमा कालावधी संपुष्टात आल्यानंतर ४५ दिवसाच्या आत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करणे बंधनकारक असून दिनांक

१५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास पूर्ण होऊनही ३७ हजार हेक्टर क्षेत्रास आजतागायत मान्यता देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागाने केळी क्षेत्राला मान्यता दिलेली नसल्यामुळे जळगांव जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांची ४५० कोटींचा विमा प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणत्याही प्रकारची पडताळणी न करता विमा निकषानुसार पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना विम्याची रक्कम अदा करण्याबाबतच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत उपस्थित लोकप्रतिनिधींनी देऊनही अद्यापपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात विम्याची रक्कम जमा झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी विम्याची रक्कम तत्काळ मिळण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०७-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने दिनांक ०८ फेब्रुवारी २०२३ रोजी आंबिया बहार २०२२-२३ मधील संपूर्ण विमा संरक्षित क्षेत्राची प्रत्यक्ष क्षेत्रिय तपासणी करण्याच्या सूचना विमा कंपनीस दिल्या होत्या. त्यानूसार क्षेत्रीय पडताळणी करण्यात आली आहे.

जळगाव जिल्हा नियोजन समितीच्या दिनांक २१/०८/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये लोक प्रतिनीधीनी सदर क्षेत्रिय पडताळणी करणे उचित नाही, असे मत व्यक्त केले होते.

सह सचिव, भारत सरकार यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २७/०९/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये प्राप्त निर्देशानुसार जळगाव जिल्ह्यांमधील लागवडीपेक्षा जास्त विमीत क्षेत्राबाबत क्षेत्र तपासणीमध्ये MRSAC च्या अहवाला नुसार प्रत्यक्ष लागवड क्षेत्रापेक्षा जास्तीचे क्षेत्र विमा संरक्षित करणे व शासन निर्णयानुसार ४ हे. प्रति लाभार्थी क्षेत्र मर्यादेपेक्षा अधिकचे क्षेत्र विमा संरक्षित करणे या कारणामुळे सुमारे ४,०८९ हे. क्षेत्र कमी केले आहे.

दिनांक १२ मार्च,२०२४ पर्यंत जळगाव जिल्ह्यामध्ये नुकसान भरपाईस पात्र इतर शेतकऱ्यांना रू.३३७.३९ कोटी नुकसान भरपाई वितरीत केले आहे.

(४) दिनांक १२ मार्च,२०२४ पर्यंत जळगाव जिल्ह्यामध्ये ६६,९८८ एकुण विमाधारक अर्जापैकी ६६,१०४ नुकसान पात्र शेतकऱ्यांना ४५४.६९ कोटी रक्कम देय होती. त्यापैंकी ४४,४२६ शेतकऱ्यांना ३३७ कोटी रक्कमेचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित २१,६७८ शेतकऱ्यांना नुकसान भरपाईचे वाटपाची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोंदिया जिल्ह्यात धान पिकावर कीडीचा प्रादुर्भाव झाल्याबाबत

**(४३) ७६२७८ (११-०२-२०२४). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात धानपीक चांगल्या स्थितीत असूनही ढगाळ वातावरणामुळे खोडकिडा, मावा, तुळतुळा यासह अनेक रोगांचा प्रादुर्भाव झाल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना हा प्रादुर्भाव टाळण्यासाठी कोणत्या औषधांची फवारणी करावी इत्यादीबाबत माहिती कृषी विभागाच्यावतीने अद्यापही देण्यात आली नसून कीडीच्या प्रादुर्भावामुळे शेतकरी चिंतीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही वा कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१२-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

गोंदिया जिल्ह्यात १५ सप्टेंबर, २०२३ या कालावधीत भात पिक फुटवे येण्याच्या अवस्थेत होते. त्यावेळी भात पिकावर अत्यल्प प्रमाणात खोडकिडा, करपा/कडा करपा व तुडतुडे या किड रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला होता.

(२) हे खरे नाही.

गोंदिया जिल्ह्यामध्ये दिनांक ०१ सप्टेंबर २०२३ ते ३० सप्टेंबर या कालावधीत कुठल्याही गावात खोडकिडा व तुडतुडा हा रोग आर्थिक नुकसान पातळीच्या वर गेलेला नाही. परंतु काही गावांमध्ये खोडकिडा आर्थिक नुकसान पातळीच्या आत दिसून आल्याने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून सदर गावांमध्ये सभा आयोजित करून तसेच या कालावधीत १२८३२० शेतकऱ्यांना किड व रोग नियंत्रणासाठी एम-किसान पोर्टलवरून उपाययोजनेबाबत संदेश पाठविण्यात आलेले आहेत. किड व रोग नियंत्रण मोहिम राबविण्यात आलेली असून यामध्ये शास्त्रज्ञ भेटी, गाव बैठका, भित्तीपत्रके लावणे, जम्बो झेरॉक्स प्रसारित करणे, प्रचार प्रसिद्ध रथ फिरविणे इ. मार्फत शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती व मार्गदर्शन करण्यात आले. तसेच डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला यांचेमार्फत देण्यात येणाऱ्या पिक ॲडव्हायजरी शेतकऱ्यांपर्यंत वेळोवेळी पोहचविण्यात आल्या. तसेच क्षेत्रिय अधिकारी/कर्मचाऱ्यांनी गावोगावी जाऊन शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन शेतकऱ्यांना किड रोग नियंत्रणाबाबत मार्गदर्शन केले.

आपत्कालीन परिस्थितीत किड व रोगाच्या नियंत्रणाकरीता ईमिडाक्लोप्रिड १७.८० ई.सी-४३० ली., क्लोरोपायरीफॉस २० टक्के ई.सी-४८७.५०ली. व हेक्झाकोनोझोल ५ टक्के ई.सी.-३२५ ली. तसेच ब्रुफझोन १५ टक्के, ॲसिफेट ३५ टक्के डब्लु पी-६०० किलो किटकनाशकांचा पुरवठा क्षेत्रिय स्तरावर करण्यात आलेला आहे. भातावरील खोडकिडा तसेच इतर किड रोगांवर प्रतिबंधात्मक उपाययोजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हा व क्षेत्रिय स्तरावरून स्थानिक वर्तमानपत्रात याबाबत वेळोवेळी निवेदने प्रसिद्ध करण्यात आली आहेत.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

### कचारवाडी (ता.केज, जि.बीड) येथील रोजगार हमी योजनेंतर्गत अंतिम भूसंपादन मोबदलाविषयक पतमर्यादा मागणीबाबत

**(४४) ७६५३२ (०६-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कचारवाडी (ता.केज, जि.बीड) येथील पाझर तलाव क्र.०१ (संचिका क्र.०४/२००४) चे रोजगार हमी योजनेंतर्गत नवीन भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंर्तगत निवाडा पारित करुन अंतिम मोबदला रक्कम रुपये ५७,७१,९२५/- चा निधी मागणी प्रस्ताव सचिव-३, नियोजन विभाग, रोजगार हमी योजना ०८, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात जिल्हाधिकारी, बीड यांनी शिफारस केल्याप्रमाणे उक्त निधी त्यांना उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.रोजगार हमी योजना मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०४-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) शासन निर्णय क्र.रोभूसं-२०२३/प्र.क्र.४२/रोहयो-८, दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२३ अन्वये निधी वितरित करण्यात आला आहे
( ४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राष्ट्रीय व उत्कृष्ठ अभिनेत्रीचा पुरस्कार मिळुनही एकाअभिनेत्रीस हलाखीचे जीवन जगावे लागत असल्याबाबत

**(४५) ७६७७८ (०९-०२-२०२४). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तासगांव (जि.सांगली) तालुक्यातील डोंगराळ पेड येथील पारधी कुटूंबातील मुलगी माया पवार यांनी लॉकडाऊन काळादरम्यान "रेखा" या लघुपटात मुख्य अभिनेत्रीची भुमिका केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रदर्शनानंतर या लघुपटास गोवा येथे झालेल्या चित्रपट महोत्सवात ६९ वा "ज्युरी राष्ट्रीय पुरस्कार" तसेच त्या माध्यमातून अभिनेत्री माया पवार यांच्या जीवनातील सत्य उत्तरकथा जनतेसमोर मांडण्यात आला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त लघुपटास राष्ट्रीय पुरस्कार व उत्कृष्ट अभिनेत्री म्हणून पुरस्कार मिळालेल्या या अभिनेत्रीस कुटूंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी जागरण, गोंधळ आणि तमाशात देखील काम करुन उदरनिर्वाह करण्याची तसेच स्वत:चे घर नसल्याने घरासाठी वणवण भटकण्याची पाळी आली असल्याचे दिनांक ६ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पारधी समाजातील राष्ट्रीय पुरस्कार व उत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार मिळालेल्या या सामान्य अभिनेत्रीने अज्ञानामुळे शासकीय आवास योजनेतर्गत घर मिळण्यासाठी तसेच हलाखीच्या परिस्थिती असतांनाही आर्थिक मदतीची मागणी शासनाकडे केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन माया पवार अभिनेत्रीला घर व आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०६-२०२४) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.
यासंदर्भात श्रीमती माया पवार यानी रेखा या लघुपटात अभिनेत्रीची भूमिका केल्याचे केंद्र शासनाच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या संकेतस्थळावरुन दिसून येते. तथापी, या विभागामार्फत लघुपट तयार करण्यात येत नाहीत.
(३) व (४) या विभागामार्फत ज्येष्ठ पात्र कलाकारांना मानधन देण्याची योजना कार्यान्वित आहे. गृहनिर्माण विभागाच्या योजने अंतर्गत कलाकारांसाठी २% आरक्षण निश्चित करण्यात आलेले असून, निकषांची पूर्तता करणाऱ्या कलाकारांना घरे उपलब्ध करुन देण्याची योजना कार्यन्वित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अचलपूर (जि.अमरावती) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये विधवा महिला, दिव्यांग व आत्महत्याग्रस्त शेतकरी यांचा समावेश करण्याबाबत

**(४६) ७७४४८ (११-०२-२०२४). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अचलपूर (जि.अमरावती) येथे विविध प्रलंबित कामासंदर्भात मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात दिनांक १२ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास एका बैठकीचे आयोजन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिहार राज्याच्या धर्तीवर राज्यातील दोन एकराच्या कोरडवाहू शेतकरी, आत्महत्याग्रस्त शेतकरी, विधवा महिला, दिव्यांग शेतकरी यांच्या शेतातील पेरणी ते कापणी पर्यंतची कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये (फळबाग लागवड) समाविष्ट करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त निर्णयाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०७-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे अंशत : खरे आहे.

मनरेगा योजनेतून ग्रामीण भागातील प्रौढ व्यक्तींना अकुशल स्वरुपाचे काम उपलब्ध करून देवून स्थावर मालमत्ता (Durable Assets) तयार करणे हे या योजनेचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. सन २०२२-२३ च्या मनरेगा योजनेबाबत केंद्र शासनाच्या वार्षिक मुख्य परिपत्रक (Annual Master Circular) मधील मुद्दा क्र. ७.२.२ च्या Non – permissible Works मध्ये नमूद केल्यानुसार सामान्य कृषी संदर्भातील कामे उदा. जमीन तयार करणे, नांगरणी करणे, पेरणी करणे, माती बदलणे, पीक कापणी करणे इ. प्रकारची वारंवारीतेची कामे अनुज्ञेय नाहीत.

पेरणी ते कापणीच्या कामांचा समावेश करण्याबाबतची मागणी वारंवार होत असल्याने सदरची कामे मनरेगा/रोहयो अंतर्गत अनुज्ञेय करण्यास परवानगी देणेबाबत दिनांक २२ मार्च, २०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आली होती. तथापि सदरची कामे मनरेगा/रोहयो अंतर्गत करता येणार नसल्याबाबत केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच पेरणी ते कापणी पर्यंतची कामे मनरेगा अंतर्गत घेणेबाबत लोकप्रतिनिधी यांचेकडून वारंवार मागणी येत असल्यामुळे शेती विषयक पेरणी ते कापणीची कामे मनरेगा / रोहयो अंतर्गत घेण्यास परवानगी देणेबाबत दिनांक २६ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये पुनश्च: विनंती केंद्र शासनास करण्यात आली असून याबाबत केंद्र शासनाचे अभिप्राय अद्याप अप्राप्त आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील कृषी विभागातील निविदा गैरव्यवहार प्रकरणी दक्षता विभागाने केलेल्या पडताळणीबाबत

**(४७) ७७९५७ (१३-०२-२०२४). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर कृषी विभागातील उपविभागीय कृषी अधिकारी दिलीप जेटकर यांनी निविदा प्रक्रियेत गैरप्रकार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांविरोधात दाखल झालेल्या तक्रारीबाबत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश कृषी विभागाला दिले असता दक्षता पथकाने दोन दिवस पालघर दौरा करुन दिनांक २९ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास गैरप्रकाराची चौकशी करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निविदा प्रक्रिया व तत्सम कागदपत्रांची चौकशी पूर्ण झाली असून चौकशीनुसार अहवाल तयार करुन कृषी आयुक्तांमार्फत शासनाला सादर केला व त्यानंतर पुढील कारवाई केली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन त्यानुसार भविष्यात असा गैरव्यवहार होऊ नये याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१२-०६-२०२४) :** (१) होय. उपविभागीय कृषि अधिकारी श्री.दिलीप जेटकर नसुन त्यांचे नाव श्री.दिलीप नेरकर हे आहे.

(२) होय.
(३) अंशत: खरे आहे. दक्षता पथकामार्फत चौकशी अहवाल संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कार्यालयास सादर केला आहे. त्यानुषंगाने ई-निविदा छाननी समिती व छाननी समितीचे सदस्य यांच्यावर कृषि आयुक्तालय स्तरावरुन प्रशासकीय कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.
(४) चौकशी अहवालानुसार दोषींवर प्रशासकीय कारवाई सुरु केली असून कृषि आयुक्तालय स्तरावरुन दोषींना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यातील महसुली गावांचे CENSUS कोड LGD पोर्टलवर मॅप करून मिळण्याबाबत

**(४८) ७७९९५ (०६-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील एकूण ३० ग्रामपंचायती अंतर्गत येणारे महसुली गाव LGD पोर्टल वरती मॅपिंग न झाल्याने ग्रामपंचायत विकास आराखडा अद्यावत करताना व ई-ग्रामस्वराज प्रणालीमध्ये काम करताना तांत्रिक अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त महसुली गावांचे CENSUS कोड LGD पोर्टलवर मॅप करून सदर गावे ऑनलाईन प्रणालीमध्ये अद्यावत करण्याबाबतची मागणी जिल्हाधिकारी, बीड यांनी जमावबंदी आयुक्त, पुणे यांच्याकडे दिनांक १ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जिल्हातील महसुली गावे LGD पोर्टलवर मॅप करून ऑनलाईन प्रणालीमध्ये अद्यावत करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक ५ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-०६-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी ग्रामविकास विभाग,महाराष्ट्र शासन यांनी LGD पोर्टलवर सदरील ग्रामपंचायती मॅप करण्याची कार्यवाही केलेली आहे व सदरील ग्रामपंचायतीचे ई-ग्रामस्वराज पोर्टलवर ग्रामपंचायत व सरपंच, ग्रामसेवक यांचे प्रोफाइल अद्यावत केले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालेगांव (जि.नाशिक) येथे महानगरपालिकेने बिनशेती मंजूरी दिलेल्या भूखंडाची खरेदी-विक्री बंद असल्याबाबत

**(४९) ७८०६१ (१७-०२-२०२४). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) येथे महानगरपालिकेने बिनशेती मंजूरी दिलेल्या भूखंडाची खरेदी–विक्री बंद असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूखंडास महानगरपालिकेने बिनशेती मंजूरी दिलेली असतांनाही खरेदी-विक्री बंद असण्यामागची कारणे काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बिनशेती भूखंडाची खरेदी-विक्री सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.

तथापि,महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये नियोजन प्राधिकरणाने किंवा यथास्थितीत जिल्हाधिकारी यांनी मंजूर केलेला पोट विभाग किंवा रेखांकन मंजूर असल्यास अशा भूखंडाच्या खरेदी-विक्री बाबत नोंदणी अधिनियम १९०८ व महाराष्ट्र नोंदणी नियम, १९६१ मधील तरतुदीनुसार दस्त नोंदणी पूर्ण करण्यात येते.

(२) व (३) लागू नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंबाजोगाई तहसिल कार्यालयातील सन १९८० पर्यंतचे सर्व प्रकारचे प्रशासकीय रेकॉर्ड जळल्याबाबत**

**(५०) ७८८१८ (०६-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई तहसिल कार्यालयाच्या रेकॉर्डरुमला सन १९८० मध्ये आग लागल्यामुळे रेकॉर्डरुममधील निजाम काळापासूनची जूनी कागदपत्रे जळाल्याने कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी कुणबी समाजाला अनेक अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी योग्य पर्याय शोधून कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०६-२०२४) :** (१), (२) व (३) होय हे अंशतः खरे आहे.

अंबाजोगाई तहसिल कार्यालयाच्या रेकॉर्डरुमला दिनांक २३.०४.२०११ रोजी शॉर्टसर्किट मुळे आग लागल्याने निजाम काळापासूनची सन १९३५ ते सन २०११ पर्यंतची सर्व कागदपत्रे जळून नष्ट झालेली आहेत. त्यामुळे कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळण्याच्या अनुषंगाने कुणबी जातीची वंशावळ जुळविण्यासाठी कुणबी समाजाला अडचणी निर्माण होत आहेत.

अंबाजोगाई तहसिल कार्यालयाच्या रेकॉर्डरुमला आग लागून आगीमध्ये निजाम काळापासूनची कागदपत्रे जळून नष्ट झाली असली तरी उपलब्ध असणा-या इतर कागदपत्रांच्या आधारे संबंधितांना कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

या अनुषंगाने योग्य पर्याय शोधून कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झाल्याचे कार्यालयीन अभिलेखावरुन निदर्शनास येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.